# ओठावरली गाणी

म. ग्रं. सं. ठाणे.
षय काव्य
. क्र. २६०७



REFBK-0026051
REFBK-0026051

रवीन्द्र भट

संदर्भ काव्य
२६०१
२६०५१
२।३।९०
२६०१
काव्य २६०५१
२।३।९०

# ओठावरली गाणी

( गीत आणि कवितासंग्रह )

रवीन्द्र भट

REFBK-0026051

REFBK-0026051

उत्कर्ष प्रकाशन, पुणे ४११ ००४

प्रकाशक
सौ. सविता सु. जोशी
उत्कर्ष प्रकाशन
रेणुका अपार्टमेंटस्
पुणे ४११ ००४

© सौ. कुमुद भट

प्रथमावृत्ती : गणेश चतुर्थी, शके १९११
४ सप्टेंबर १९८९

मुखपृष्ठ
श्री. जयंत खरे

मुखपृष्ठ छपाई
विनायक आर्टस्

मुद्रक
सा. रा. भंडारी
भंडारी मुद्रणालय
२७१ नारायण पेठ,
पुणे ४११ ०३०

मूल्य ५०/- रुपये

कै० डॉ० रा० शं० वाळिंबे

तुम्ही माझी प्रस्तावना लिहिण्याआधीच
स्वतःचे भरतवाक्य म्हणालात.
आतां माझ्या हाती उरलं फक्त
या पुस्तकाचं तुमच्या
स्मृतीला समर्पण !

रवीन्द्र भट

# मनोगत

तशी कवितेशी सलगी होऊन बरीच वर्षे झाली. अगदी बालवयापासूनच काही अबोध सुरावटी मनात पिंगा घालायच्या. शब्दांची आतषबाजी व्हायची. काहीतरी अबोध, अनाकलनीय जाणवायचं. सभोवती घडणाऱ्या घटनांच्याविषयी सर्वसामान्यांपेक्षा अगदी विरुद्ध टोकाची मतं तयार व्हायची. भोवताली पाहाण्याचा दृष्टिकोण क्षणाक्षणाला बदलायचा. कधीतरी काही स्वप्नभारल्या विचारांचं आवर्त उठायचं आणि भोवतालच्या समूहापेक्षा आपण कुणीतरी वेगळ्या समूहातील आहोत असं तीव्रतेनं भासायचं. आणि हे सारं भासणं भाष्यरूप करण्यासाठी शब्द शोधायचा वेडावाकडा प्रयत्न व्हायचा. सभोवताल कुत्सितपणे हसायचा. लोकव्यवहाराच्या तराजूत मूल्यहीन ठरवायचा. मग स्वतःचं मूल्य सांगण्यासाठी पुन्हापुन्हा शब्दांची विनवणी करायचो. पण तेही बिचारे वर्षानुवर्षे रुसलेलेच. मग मी कधी कधी मूक व्हायचो. कधी कधी वाचाळ व्हायचो. मेणाचे पंख लावून सूर्याकडे झेप घ्यायचा प्रयत्न करायचो. क्षणिक सूर्यबिंब कवेत घेता येईल इतकं जवळ यायचं, आणि त्याच्या उष्णतेने माझे मेणाचे पंख वितळून जायचे. सुसरी, मगरी आणि शार्क माशांनी भरलेल्या महासागरात मी उल्केच्या वेगाने कोसळायचो. कोसळता कोसळता कुठल्यातरी अनामिक ओंडक्याचा आधार मिळायचा. मग त्या ओंडक्याबरोबर प्रवाहपतीत होणं अनुषंगानं आलंच. ओंडक्याला स्वतःची गती नाही, हे जाणवता जाणवता अचानक यौवनाचा किनारा दिसू लागला. किनाऱ्यावर सोनेरी वाळू होती. हिरवीगार वनश्री होती. वाऱ्याच्या झुळुकीबरोबर वेळुबनातल्या बासरीतून अखंड स्रवणारे आश्वासक सूर होते. साऱ्या सृष्टीला तृप्त करणाऱ्या पंचमहाभूतातील सारं चैतन्यच तिथे एकवटलं होतं. पक्ष्यांच्या कूजनात, उन्मेषाचा सर्वांग मोहरून टाकणारा सूर होता. चेतनाहीन ओंडक्याची संगत सोडून या चैतन्य किनाऱ्याकडे मी साऱ्या शक्तिनिशी झेप घेतली. किनाऱ्यावर पाऊल टाकताच तिथल्या साऱ्या चराचरांनी माझ्या पिंडाला स्पर्श केला. आणि जादूगारानं फुंकर घालावी त्याप्रमाणं सारी पचमहाभूतंच शब्दब्रह्म होऊन माझ्यापुढं उभी ठाकली ! सृष्टीमधील जे जे सुंदर, उदात्त, मंगल आहे, ते सारंच लेखणीत स्थिर झालं. आणि कानांत कुणीतरी सांगावं त्याप्रमाणे ऐन तारुण्यात माझी कविता शब्दरूप घेऊन आधी अंतःकरणात उमलली, आणि अनाहताचा स्वर घेऊन कागदावर उमटली !

नवनिर्मितीचा हा पहिला महोत्सव घडला, त्याला आता जवळजवळ तीसपस्तीस वर्षं झाली. आजतागायत कोणतेही सव्यापसव्य न करता हा शब्द-महोत्सव एखाद्या यज्ञकुंडाप्रमाणे सतत तेवत राहिला. निर्मितीच्या या यज्ञकुंडामध्ये गुणाढ्याप्रमाणे लक्षावधी कविता कदाचित जळूनही गेली असेल. आज पन्नाशी ओलांडल्यावर पोथीतली उरलेली पानं रसिकांसमोर मांडतोय. हा शब्दयज्ञ कधीही थांबणार नाही. देणारा उदंड देतोय. माझ्या झोळीत झेलता येईल तेवढं मी झेलतोय. सृष्टीरचनेमधला मी एक लक्षातसुद्धा न येणारा अंशरूप बिंदू. माझ्या शक्तिनुसार पांची महातत्त्वांना आळवण्याचा हा एक प्रयत्न! या साऱ्या प्रयत्नांच्या मागे साऱ्या चराचराला सुखशांती मिळावी ही एकमेव प्रेरणा आहे. कृपावंत देणाऱ्याच्या देण्यानं मी भाग्यवंत झालो आहे. आज मनाच्या निरामय अवस्थेत ज्यानं दिलं त्याच्याच पायी ते वाहत आहे. या कवितेमुळे एखाद्याच्या मनातलं दुरित दूर झालं, नवा प्रकाश मिळाला, कुणाला आधारवडाची छाया मिळाली, कुणाला पूर्णानंदाचा लाभ घडला तर माझ्या या शब्दयज्ञाचं सुफळ मला संपूर्ण मिळालं असं मी विनम्रपणे म्हणेन!

एकत्र संग्रहित स्वरूपातील माझी ही कविता प्रकाशात आणण्याची सारी प्रेरणा माझ्या पत्नीची. तिचेच सूर लेवून माझी बरीच कविता रसिकांच्या समोर आली. उत्कर्ष प्रकाशनाच्या श्री. सुधाकर जोशी यांनी माझ्या जन्मगावच्या नात्याला स्मरून माझी ही कविता प्रकाशित करण्याचा माझ्या पत्नीचा हा मनोदय जाणला. मित्रवर्य जयंत खरे यांनी त्वरित योग्य मुखपृष्ठ चितारून दिले. मुद्रक श्री. भंडारी, मुखपृष्ठाची रंगीत छपाई करणारे विनायक आर्टस् हे सारेच माझे सोयरे सज्जन. या सर्वांच्या अखंड परिश्रमातून माझी कविता काहीशी उशीरा का होईना रसिकांच्यापुढे येत आहे हे माझे परमभाग्य आहे असे मी समजतो.

ॐ ज्ञानपीठ
१२२१, अ, रँग्लर परांजपे रस्ता
पुणे ४११ ००४

— रवीन्द्र भट

र
वी
न्द्र
भ
ट

# ओ | ठा | व | र | ळी  गा | णी

# ओठावरली गाणी

रवीन्द्र भट

## आज गाणं गायचं आहे !

अजून पुढे कितीतरी आनंदरूप पाह्यचं आहे।
आज गाणं गायचं आहे ॥

बहीण भाऊ सोयरे धायरे,
यांना काही द्यायचं आहे !
आज गाणं गायचं आहे ॥

मोह माया राग लोभ,
यांचं तर्पण व्हायचं आहे।
आज गाणं गायचं आहे ॥

दु:ख, दैन्य, बोच, व्यथा,
एक फुंकर व्हायचं आहे ?
आज गाणं गायचं आहे ॥

गाण्याशिवाय माझ्याजवळ आहे काय ?
सूर ताल ल्यायचं आहे,
आज गाणं गायचं आहे ॥

१९८३

## ना सावली निवारा !

ना सावली निवारा जळल्या कथा उन्हात
मी एकटीच येथे साऱ्या उभ्या जगात ॥ धृ ॥

वेलीवरी कळीचे कधी फूल नाही झाले.... !
आतील गंध सारे ना रंग रूप ल्याले।
निर्माल्यमात्र उरले घेता कुणी करात ॥ १ ॥

एका पहाटवेळी आला समीर मंद।
त्या स्पर्शमात्र वेगे झाले शरीर धुंद।
मी सैरभैर झाले त्या सावळ्या मिठीत ॥ २ ॥

गेला निघून वारा कुठल्या अमूर्त देशा... ?
त्याची न जाणिली मी हळवी निरोप भाषा।
हा शाप का सजा ही भाळास दैवदत्त ॥ ३ ॥

आता उरात आहे वेडी अबोल आशा।
मी थोपवीन माझ्या या सर्व सर्वनाशा।
फिरुनी पहाटवेळी येईल तो बनांत ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९७६

# मी स्वप्न पाहिले जे

मी स्वप्न पाहिले जे,
सांगू कुणास बाई ।
माझ्या मनांत आली,
आली फुलून जाई ॥ धृ ॥

येणार नाथ केव्हा ?
मज ठाऊकेच नाही !
परि स्वागतास आला,
शिशिरी वसंत देही ।
हंसतात मैत्रिणी या,
हंसते हळूच आई ॥ १ ॥

ना देह ना लता ही,
तो वृक्ष आसऱ्याला ।
आभास मीलनाचा,
राज्ञीपदास आला ।
स्पर्शात मन्मथाच्या....
निश्वासल्या दिशाही ॥ २ ॥

संपून रात्र गेली....,
बहरून भाव आले ।
नादावल्या कळीचे....,
मी सूर्यफूल झाले ।
ते स्वर्ग अमृताच्या,
ओल्या दंवात न्हाई ॥ ३ ॥

संगीत : राम फाटक, आकाशवाणी
विश्वनाथ मोरे, एच. एम. व्ही.

१९६८

# झाड म्हणतं धारा दे !

झाड म्हणतं धारा दे,
पाखरू म्हणतं चारा दे ।
सृष्टीमधल्या चराचराला,
देवा सौख्य निवारा दे ॥ धृ ॥

नदी ओहळा पाणी दे,
वनवेळूंना गाणी दे ।
अखंड बादळ नको ईश्वरा,
झुळझुळणारा वारा दे ॥ १ ॥

तृणकोंभाना प्रकाश दे,
नवांकुरांना विकास दे ।
दुष्काळाची नको गर्जना...,
सृजना सर्व शिवारा दे ।

उन्मेषाला सुस्वर दे....,
सत्यशिवासह सुंदर दे ।
विकास गतिला प्रत्येकाच्या,
सदैव फिरता फेरा दे ॥ ३ ॥

मांगल्याचे गाणे दे....,
सौभाग्याची वाणे दे ।
चिरंतनाच्या विश्रांतीला.....
तुझ्या पदाशी थारा दे ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९७८

# मानवतेचे मंदिर माझे

मानवतेचे मंदिर माझे । आंत लाविल्या ज्ञानज्योती ।
श्रमिक हो, घ्या इथे विश्रांती ।। धृ ।।

बंधुत्वाची येथ सावली । अनाथ अमुचे मायमाऊली ।
कधी दिसे का ईश राऊळी ?
देव ते अंतरात नांदती ।। १ ।।

आम्ही लाडके विठूरायाचे । लेणे जरीही दारिद्र्याचे ।
अभंग ओठी मानवतेचे ।
मृदुंगी वेदनेस विस्मृती ।। २ ।।

हे सेवेचे व्रत शरपंजर । घरांत आम्ही राजमहेश्वर ।
सेवाधर्मी पुण्यमहंतर....,
नांदते दिव्य संतसंगती ।। ३ ।।

दार घराचे सदैव उघडे । भागवताची ध्वजा फडफडे ।
भावभक्तीचे आम्हा साकडे.... ।
पथिक हे परंपरा सांगती ।। ४ ।।

चित्रपट : ते माझे घर
संगीत : सुधीर फडके

१९६१

## ना सावली निवारा !

ना सावली निवारा जळल्या कथा उन्हात
मी एकटीच येथे साऱ्या उभ्या जगात ॥ धृ ॥

वेलीवरी कळीचे कधी फूल नाही झाले.... ।
आतील गंध सारे ना रंग रूप त्याले ।
निर्माल्यमात्र उरले घेता कुणी करात ॥ १ ॥

एका पहाटवेळी आला समीर मंद ।
त्या स्पर्शमात्र वेगे झाले शरीर धुंद ।
मी सैरभैर झाले त्या सावळ्या मिठीत ॥ २ ॥

गेला निघून वारा कुठल्या अमूर्त देशा... ?
त्याची न जाणिली मी हळवी निरोप भाषा ।
हा शाप का सजा ही भाळास दैवदत्त ॥ ३ ॥

आता उरात आहे वेडी अबोल आशा ।
मी थोपवीन माझ्या या सर्व सर्वनाशा ।
फिरुनी पहाटवेळी येईल तो बनांत ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९७६

# मी स्वप्न पाहिले जे

मी स्वप्न पाहिले जे,
सांगू कुणास बाई ।
माझ्या मनांत आली,
आली फुलून जाई ॥ धृ ॥

येणार नाथ केव्हा ?
मज ठाऊकेच नाही !
परि स्वागतास आला,
शिशिरी वसंत देही ।
हंसतात मैत्रिणी या,
हंसते हळूच आई ॥ १ ॥

ना देह ना लता ही,
तो वृक्ष आसऱ्याला ।
आभास मीलनाचा,
राजीपदास आला ।
स्पर्शात मन्मथाच्या....
निश्वासल्या दिशाही ॥ २ ॥

संपून रात्र गेली....,
बहरून भाव आले ।
नादावल्या कळीचे....,
मी सूर्यफूल झाले ।
ते स्वर्ग अमृताच्या,
ओल्या दंवात न्हाई ॥ ३ ॥

संगीत : राम फाटक, आकाशवाणी
विश्वनाथ मोरे, एच. एम. व्ही.

१९६८

# सखे ग आला श्रावणमास

पाऊसवेडा माझा जिवलग,
येईल का सदनास ?
सखे ग, आला श्रावणमास ॥ धृ ॥

आषाढी मी वाट पाहिली ।
किती आसवे नयनी आली ।
त्या अश्रूंतुन झरझर झरले,
आठवणींचे भास ॥ १ ॥

क्षणांत पाऊस पुढे चांदणे....,
तसेच त्याचे हंसणे रुसणे ।
त्या हंसण्याचा त्या रुसण्याचा....,
सतत अंतरी वास ॥ २ ॥

वर्षाकाळी एकेवेळी....,
मेघवर्ण मी प्याले डोळी ।
हृदयी माझ्या अजुनि त्याच्या
बासरीतला श्वास ॥ ३ ॥

संगीत : अरविंद गजेन्द्रगडकर

१९६८

# राधिकेचा श्रीहरी

अंतरीचे गूज माझ्या आज ये ओठांवरी।
पाहिला मी तव स्वरूपी राधिकेचा श्रीहरी ॥ धृ ॥

भावना आसावल्या या
शब्द ओठी रंगले।
मी तुझ्या मूर्तीत देवा
प्रियकराला पूजिले।
फूल माझ्या भावनांचे
वाहिले चरणांवरी ॥ १ ॥

देव आणि भक्त यांचा,
बंध आहे कोवळा।
स्पर्श तो भोगून उरला,
या तनूवर सांवळा।
मीलनाचे गीत माझ्या
उमलले मधु अंतरी ॥ २ ॥

तूं सखा परिपूर्ण सविता
मी प्रकाशी थांबले।
मार्ग दावी मंदिराचा
मी खुळी नादावले।
टाकुनि जाऊ नको रे
विरहरूपी संगरी ॥ ३ ॥

चित्रपट : नसती उठाठेव — १९७२
संगीत : राम कदम

## गोठल्या ज्या भावना

गोठल्या ज्या भावना तूं त्या वृथा फुलवू नको।
अंतरीच्या गूढ उर्मी त्या वृथा झुलवू नको ।। धृ ।।

आठवांना मी तुझ्याही जपुन हृदयी ठेविले।
स्पर्श सारे ते प्रमाथी तव स्मृतीला वाहिले।
आज सरले गंध सारे स्वप्न तूं कवळू नको ।। १ ।।

मार्ग माझा रोखलेला तूं तुझ्या जगती रहा।
मी इथे कोषात आहे रेशमाचा पाश हा।
पाश तो तोडून वेड्या आंत तू येऊ नको ।। २ ।।

जन्म दुसरा देतसे कां दैव साऱ्या माणसा ?
मी तुला वाहीन राया तव स्मृतीचा वारसा।
तोवरी तूं वाट पाही वचन हे विसरू नको ।। ३ ।।

संगीत : सौ. कुमुद भट १९७५

# काल होते मी कळी !

काल होते मी कळी ती पूर्णपुष्पा जाहले ।
पौर्णिमेच्या पूर्णचंद्रा प्रथमरात्री पाहिले ।। धृ ।।

गंध नव्हता, रंग कसला, अंतरंगी मी खुळी ।
उमलली नव्हती तनूची वेढलेली पाकळी ॥
तिजवरी या चांदण्याला आज त्याने शिंपिले ।। १ ।।

जाहले काही अभावित मी पुरी नादावले ।
यौवनाचे गीत अवघे गंधवेडे रंगले ।
नूपुरांचे नाद साऱ्या रोमरोमी नाचले ।। २ ।।

श्वास होता वेढलेला स्पंदने हृदी थांबली ।
मीच माझ्या भावनांची स्पर्शचित्रे पाहिली ।
पापणीच्या आंत एका स्वप्नरंगी दंगले ।। ३ ।।

सांगण्या आधीच कोणा पाकळ्या का उमलल्या ?
या तनूवर त्या पताका मीलनाच्या जाहल्या ।
आणि देठातून माझ्या चंद्रफल हे जन्मले ।। ५ ।।

१९७६

# अबोलीला करायची कशी बोलकी ?

अबोलीला करायची कशी बोलकी ?
तिच्यासाठी दारी उभी शब्दपालखी ॥ धृ ॥

कधीतरी वाऱ्यावर हळूच फुलेल
कधीतरी सायंकाळी एकांती डुलेल ।
नसे तिला मनातले गूज ठाऊकी ॥ १ ॥

पापणीच्या आंत दडे कोठले गुपित ?
रंगातुन ओघळते गूढ स्वप्नगीत ।
यौवनाच्या झुल्यावर झुले लाडकी ॥ २ ॥

पश्चिमेला मंद झाली शुक्रचांदणी
पहाटेच्या वाऱ्यावर मिटे पापणी ।
कोमेजुन जाईल ना कळी हाय की ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९७८

# तूं फूल होऊनी येशील कां ?

मधुगंध शिंपुनी हंसशील का ?
तूं फुल होऊनी येशिल का ? ॥ धृ ॥

झाडास किती मी विचारिले
वाऱ्यावर नुसते ते डुलले ।
मन वाट पाहता थरथरले
देठांत जन्म तू घेशिल का ? ॥ १ ॥

रंग कोवळे भवती रानी ।
दंवबिंदूंचे त्यावर पाणी !
मधून गाती पक्षी गाणी !
तूं गंध सुरांना देशिल कां ? ॥ २ ॥

शब्दांत विश्व मी कसे धरू ?
आकाश घटांना कसे भरू ?
गत जन्म मीलना काय स्मरू ?
सत्यांत स्वामिनी होशिल कां ?

संगीत : सौ. कुमुद भट १९८३

# कांही स्मृती जळाल्या !

कांही जुन्या स्मृतींची रचिली अबोध गाणी ।
काही स्मृती जळाल्या त्यांचीच ही विराणी ॥ धृ ॥

एका सुरावटीला शब्दांत गुंफिले मी.... !
आवर्त भावनांचे कैफात जाळिले मी ॥
माझ्याच वेदनेची मी गाईली कहाणी ॥ १ ॥

त्या वेदनेस हंसला व्यवहार या जगाचा ।
देठामधून तुटला धागा कळीकळीचा ॥
हरवून गंध गेला निस्तेज रातराणी ॥ २ ॥

फिरतात तेजवलये आतां सभोवताली....,
माझ्याच निर्मितीला सुमने कितीक आली ।
परि रातराणीचा त्या ना साद येई कानी ॥ ३ ॥

१९८३

# आकाश पेलताना !

आकाश पेलताना, मी क्षितिजरूप झाले ।
मजला कवेत घेण्या, आले कितीक गेले ॥ धृ ॥

पायास कोणी ओढी, कमरेस खेंव घाली ।
नाचे कुणी प्रमाथी, माझ्या सभोवताली ।
ध्यासांत कोणी वेडे, शत, जन्म जन्म जळले ॥ १ ॥

गर्वांत धुंद कोणी, अभिमान सांगताती ।
एकाच स्पर्शमात्रे, सर्वस्व जाळताती ॥
अंगार जन्मतः मी. त्यांचे न त्यांस कळले ॥ २ ॥

माझ्या मनोरथाचा, अनिवार वेग आहे ।
आभास, सत्य, मीही, मधलीच रेघ आहे ।
प्राचीवरील देवा, मी जन्मताच वरिलें ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९८३

## एकटी मीच इथे घरट्यांत

भरून आले मेघ अचानक नाही परतले नाथ
एकटी मीच इथे घरट्यांत ॥ धृ ॥

सुटले बादळ, झाड थरथरे
पडती वरुनि थेंब टपोरे ।
शेज शेबरी भिजुनि गेली ओलेल्या पर्णात ॥ १ ॥

मेघगर्जना मधून होते.... !
दूर अचानक तडिता पडते ।
साद कुणाला ऐकू यावी अवघ्या आकांतात ॥ २ ॥

असाल कोठे कुठल्या रानी .... ?
कुठला चारा कुठले पाणी.... ?
शोधायाचे कुठे न कळते भवती अंधारात ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८३

# वळिवाचे ढग

वळिवाचे ढग आले वरती....,
धरती खाली आतुरली।
झाडांसंगे वारा खेळे,
भिंगोऱ्या अन् भातुकली ॥ धृ ॥

फुलवुन अपुले रंगपिसारे,
मोर छेडिती केका ग।
वाळूवरती गोगलगायी
उगा रेखिती रेखा ग।
पानामागे उमलून येण्या
कळी कळी ही आसुसली ॥ १ ॥

कसे नभाला कळले अवचित,
धुंद जाहल्या सर्व दिशा।
भर माध्यान्ही त्यांच्याबरती,
कशी दाटली धुंद निशा।
चिरंतनाच्या स्पर्शासाठी,
सृष्टी अवघी व्याकुळली ॥ २ ॥

झरझर झाल्या सरी मोकळ्या
रंग नभाचा बदले ग।
"तृप्त तृप्त मी" कानी त्याच्या
हळूच कोणी वदले ग।
ऐकुन हितगुज मुग्धयौवना
उगाच गाली बावरली ॥ ३ ॥

१९८३

# माझेच मला ना कळले !

माझेच मला ना कळले....!
हे कसे अचानक घडले....? ॥ ध्रु ॥

हा गंध अनामिक कुठून आला दारी?
मी अंगोअंगी मोहरले ग सारी।
स्पर्शात अभावीत आर्त मनीचे जळले ॥ १ ॥

सहवास क्षणाचा चिरंतनाची ग्वाही।
सर्वस्व मीच त्या चिरंतनाला वाही।
त्या मधुर क्षणाशी नाते माझे जडले ॥ २ ॥

ते मूर्त प्रकटले भावस्वप्न सोनेरी।
माझ्याच पापण्या झाल्या माझ्या वैरी।
तो समीप येता डोळे कां ग मिटले? ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८३

## पाऊलखुणा !

चाहूल तयांची अबोध तरीही कळते।
पाऊलखुणा या त्यांच्या मी ओळखते ॥ धृ ॥

हा गंध अनामिक येतो वाऱ्यावरुनी।
कानांत घुमावा सूर अनामिक दुरुनी।
ती शीळ पहाटे साद होऊनि येते ॥ १ ॥

मज असा अचानक कधी लागतो श्वास।
अन् मिटल्या नेत्री होती नवखे भास।
ते सुचिन्ह माझ्या पापणीसही कळते ॥ २ ॥

मी दारावरती नजर लाविते जेंव्हा।
भासते, वाजते कडी हळुहळु तेंव्हा।
मी उठते, बसते, उंबऱ्यात अडखळते ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८४

## ही प्रीत म्हणू की फसणे ?

मज सदैव स्मरते खट्याळ त्यांचे हसणे।
ही प्रीत म्हणू की फसणे ? ।। धृ ।।

मी भल्या पहाटे होते अवचित धुंद
श्वासात मिसळतो बकुळफुलांचा गंध।
त्या गंधामागे मिठीत त्यांच्या विरणे ।। १ ।।

ओढाळ मनाला कसे आवरु बाई ?
हंसतात मैत्रिणी उगाच करिती घाई।
वळणावर तरीही पाऊल माझे अडणे ।। २ ।।

सरणार कधी ही व्याकुळता अनिवार ?
येईल कधी का स्वप्नाला आकार ?
गतजन्मापासुन दैवदत्त हे झुरणे ।। ३ ।।

संगीत : सौ. कुमुद भट — १९८४

## माझ्या मनी कसे ग

माझ्या मनी कसे ग उमलून फूल आले ?
मी एकटीच त्याच्या गंधात चिंब न्हाले ॥ धृ ॥

नव्हती पहाट झाली वाराही स्तब्ध होता ।
पर्णी पहाटपक्षी अजुनि निजेत होता ।
कानांत कोणी वेडे हितगूज करुनि गेले ॥ १ ॥

चाहूल ती कुणाची कळली अजून नाही ।
येणार कोण केंव्हा कसलीच जाण नाही ।
बक्षावरी कळ्यांचे कुणी हार गुंफियेले ॥ २ ॥

हा खेळ कोण खेळे माझ्या तनामनाशी ?
लपले अतर्क्य कांही माझ्या खुळ्या उराशी ।
जाणीव यौवनाची मी मोहरून गेले ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८४

## मी बाहुपाशी होते

स्मरते अजून नाथा पहिली अबोध भेट ।
मी बाहुपाशी होते झाली जरी पहांट ॥ धृ ॥

श्वासात सूर होता सर्वांग मीलनाचा ।
तो सूर ताल झाला माझ्या तनामनाचा ।
रस सर्व भोगिले मी त्या देह अर्पणात ॥ १ ॥

तूं पूर्णपुरुष नाथा मी रूप प्रकृतीचे ।
अपुले सदैव आहे नाते सनातनाचे ।
ही दैवदत्त आहे शतजन्म जन्म साथ ॥ २ ॥

हे स्पर्श ना प्रमाथी ही ओढ अंतरीची ।
उपभोग नाही कसला ही जाण सफलतेची ।
अद्वैत साहिले मी, त्या पूर्ण मीलनात ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८४

## असाच होता वेडा पाऊस ... !

असाच होता वेडा पाऊस,
अशीच होती रात्र वादळी ।
आज हरवली परी जिवलगा,
तुझ्या मिठीची ऊब सांवळी ।। धृ ।।

अशीच टपटप पागोळ्यांची,
हृदयांतरी लय समर्पणाची !
जळी मिसळल्या जलबिंदूसम,
सम श्वासांची मिसळून गेली ।। १ ।।

विचारिले त्या पागोळ्यांना,
माझा जिवलग कोठे गेला ?
रिती राहिली इथे माझिया,
प्रीत फुलांची गंधपाकळी ।। २ ।।

रंग गंध हे त्याच्यासाठी,
जपले होते हृदयी ओठी !
अखेर अंती थरथरणाऱ्या,
गालावरती धरे काजळी ।। ३ ।।

सौ. कुमुद भट १९८४

## हे वेड असे ग ....!

हे वेड असे ग जगावेगळे कुठले ?
मज हवेहवेसे भंवती वादळ सुटले ? ॥ धृ ॥

त्या बळकट हाती हात प्रथम मी दिला,
तळहात सखे ग मेंदी-महिरप झाला ।
रोमांच अनोखे सर्वांगावर उठले ॥ १ ॥

मोहरली सारी सर्वांगाने तनू !
दरवळास या मी गंध कोठला म्हणू ?
अस्तित्व भानही माझे अवघे मिटले ॥ २ ॥

तो वारा वेडा झेप घेऊनी आला,
स्पर्शात तयाच्या श्वास मिसळुनी गेला ।
क्षण जन्मजन्मीचे देणे सारे फिटले ॥ ३ ॥

त्या सुखद आठवा जपुन ठेविले हृदयी ।
नुपूर तयांचे बांधियले ग पायी,
त्या अखंड नादे बंध जगाचे तुटले ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट — १९८६

## ढग येतात जातात—

ढग येतात जातात । मोर नाचती रानांत ।
एक भिजलेलं गूज । कुणी सांगतं कानात ॥ धृ ॥

वारा हालवितो साऱ्या । झाड झुडोऱ्याचे अंग ।
नर सांबर घाशितो । कुठे खोडावर शिंग ॥ १ ॥

मुंगी रांगेत धावते । कण घेवोनिया मुखी ।
चार म्हैन्याची बेगमी । राणी वारुळांत सुखी ॥ २ ॥

गच्च मधाळ पोवळे । उंच फांदीला टांगले ।
काळ्या अस्वलापासूनी । मधमाशांनी राखिले ॥ ३ ॥

वीज नभाला भिडली । बाकी सारे सारे शांत....
नर मादी जुगताना । गच्च जाळीचा एकांत ॥ ४ ॥

थेंब मातीत पडला । नवनिर्माण कौतुक ।
चोच वासूनिया उभा । एक लहाना चातक ॥ ५ ॥

सरी मागोमाग आल्या । चिंब चेतना जाहली
एका सृष्टीतून पुन्हा । नवी सृष्टी जन्मा आली ॥ ६ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८८

# काय शोधिशी का बावरशी ?

काय शोधिशी, कां बावरशी ?
ठाऊक तुजला आहे !
पुढच्या वळणावरी प्रिया रे
माझे घरटे आहे ॥ धृ ॥

त्या वळणावर पहिले आपण,
केले होते स्मित संभाषण ।
सरले माझे सारे मीपण,
अजून स्मरते आहे ॥ १ ॥

थरथरते स्मित गालावरती,
मिटे पापणी लाजुन पुरती ।
त्या लज्जेची खूण अजुनही,
ओठावरती आहे ॥ २ ॥

आठव क्षण तो, आठव तो दिन,
आठव वचने आठव बंधन ।
स्मरेल तुजला ते क्षणस्पंदन,
जे मी जपले आहे ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९८८

# सूर्यदेव आला आला

सूर्यदेव आला आला वेळ टळे साजणाची
कुणा कशी सांगायची ओढ या मनाची ॥ धृ ॥

वल्हारिली त्याने नाव क्षितिजाच्या पार ।
रातभरी लाभे त्याला दर्याचा शेजार ।
वाट पाहते मी वेडी पोर कोळियाची ॥ १ ॥

कुणी म्हणे दर्यावरती जाहले वादळ ।
कुणी म्हणे तारवाचा फुटलासे तळ ।
किनाऱ्यास पण ही उघडी पुळण ओहटीची ॥ २ ॥

ऐक देवराया सदया गूज अंतरीचे ।
आसवे पुसाया यावे धनी विरहिणीचे ।
तुझ्याविणा सांगू कोणा व्यथा ही खुळीची ॥ ३ ॥

चित्रपट : गोविंदा गोपाळा — १९८०
संगीत : सौ. कुमुद भट

## मी इंद्रधनुष झाले

उधळीत यौवनाचे मी सप्तरंग आले।
आले तुझ्या मिठीत मी इंद्रधनुष झाले ॥ धृ ॥

तूं कोण कोठला रे तैसा अनोळखी तूं।
मेघात साठलेला अवघा अबोधही तूं।
वर्षाव अमृताचा रंगात मीही न्हाले ॥ १ ॥

उन्मेष पौरुषाचा तुज सर्व शोभणारा।
आवेग बाहुमधला अवकाश कवळणारा।
साहून स्पर्श फुलता मी मोहरून गेले ॥ २ ॥

दोघांमधील क्षितिजा, सोपान जोडलेला।
हा सप्तरंग सेतू थेंबात जन्मलेला।
स्पर्शून तेजराशी नवरंगबीज उमले ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९८९

# गट्टी फू केली

अवघे रुसणे जगावेगळे कुजबुजही झाली ।
प्राजक्ताने बकुलफुलाशी गट्टी फू केली ॥ धृ ॥

शेजाऱ्याच्या अंगणांतही बरसे प्राजक्त ।
पायाखाली रांगोळीवर बकूळ आसक्त ।
परिमळातही अंगणसीमा अवगुंठित झाली ॥ १ ॥

आला वारा सोडविण्याला नवखे भांडण ।
जाईजुईंनी नाक मुरडिले माना वेळावुन ।
भुईचाफ्याची परागपाने वेडी थरथरली ॥ २ ॥

नभ कोसळले पाऊसधारा अवनीवर आली ।
अंगणातली ओहळरेखा नदीकडे गेली ।
ओहळातुनी दोन्ही सुमने पोहाया लागली ॥ ३ ॥

नदीकिनारी उघडी होती एकच शाळुंका ।
त्याच्या स्पर्शे सर्व संपला दोघांचा हेका ।
अपुले फुलणे देवासाठी खूण तया कळली ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८९

## मागणे न काही आता

सदा अंतरी मी देवा तुझे रूप पाही ।
मागणे न काही आता मागणे न काही ।। धृ ।।

कृपावंत तूची नाथा तुला पूर्ण ठावे ।
तृप्त जीवनी या मजला अधिक काय द्यावे ?
कणाकणामध्ये माझ्या तुझे रूप राही ।। १ ।।

झाड मागते कां छाया स्वतःची स्वतःला ?
सूर्य मागतो का तेजा स्वतःचे स्वतःला ?
नदी जळा सामावुनिया जळाकडे जाई ।। २ ।।

गंध चंदनाचा कधी का लेप मागतो रे ?
शीतलता जळते त्याची धूप होऊनी रे !
गंधवंत अवघे होता तोच तृप्त होई ।। ३ ।।

नुरे मला कसली आता क्षितिजबंध रेखा ।
रूप मला अवकाशाचे सरे तिमिरहेका ।
तुझी तूंच चैतन्याची ज्योत करी घेई ।। ४ ।।

संगीत : सौ. कुमुद भट

१९८९

# गाणे आपण गाऊ ग !

सभोवताली मांगल्याचे समूर्त रुपडे पाहू ग ।
गाणे आपण गाऊ ग ।। धृ ।।

अवतीभवती हिरवी राने ।
देती छाया पिंपळपाने ।
पारावरच्या शाळुंकेवर बिल्वपत्रही वाहू ग ।। १ ।।

नदीकाठच्या मळईवरती ।
कणसावरती उमटे मोती ।
देवाजीचे अवघे देणे भुकेजल्याला भरवू ग ।। २ ।।

नभांत प्रकटे तडिता रेखा ।
बनांत घुमते मयूरकेका ।
स्वातीचे जलथेंब मनाच्या शिंपल्यातही झेलू ग ।। ३ ।।

मळभ मनीचे संपुन गेले ।
देणेघेणे कसलें नुरले ।
आनंदाच्या अनुपमराशी येईल त्याला देऊ ग ।। ४ ।।

संगीत : सौ. कुमुद भट

१९८९

## ॥ गणेशस्तवन ॥

प्रथम फूल हे ओंकाराच्या वाहियले पायी ।
या पूजेच्या सांगतेस श्री गजानना येई ॥ धृ ॥

वेदारंभी तुझीच स्तवने मुनी ऋषी गाती ।
तुला प्रार्थिती सामगायने योगीजन ध्याती ॥
ऋचाऋचातुन तुझी प्रार्थना मंगलमय होई ॥ १ ॥

तुझिया चरणी विनीत अवघे अवनी आकाश ।
तूं ज्ञानाचा दीप सनातन तिमिराचा नाश ॥
वीणेवरती सरस्वती तुज आळवीत राही ॥ २ ॥

या यज्ञाच्या वेदीवरती दुरिताची आहुती ।
विश्वशांतीची सौभाग्याची उमलावी आरती ॥
शिवपुत्रा, या यज्ञमंडपी प्रगटरूप घेई ॥ ३ ॥

तूं पृथ्वीच्या प्रदक्षिणेचा मार्ग दावणारा ।
माता महती सर्व जगाला तूच सांगणारा ॥
तुझीच स्तवने सिद्ध गणेशा दिशा दिशा गाई ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९८३

हे शारदे हे अंबिके। हे विश्वविलसित पावके।
तुझिया पदावर नम्र ही। ज्ञानार्जनास्तव बालके ॥ धृ ॥

बुद्धिदात्रि तूंच गे। तू ज्ञानदायी देवता।
निर्माण तूं नेतृत्व तूं। तूं मोक्षदायी सांगता ॥
वीणाधर कमलासिनी। हे विश्वसूत्र प्रयोजके ॥ १ ॥

सायुज्य तूं साफल्य तूं। तूं मोक्षदायी प्रेरणा।
वीणेवरी छेडूनिया। साध्यास देई साधना ॥
स्तवने तुझी गाती मुनी। गुंफूनिया गुण कौतुके ॥ २ ॥

तू चेतना उन्मेश तूं। देई सुभक्ता प्रेरणा।
वीणेवरी छेडूनिया। साध्यास देई साधना।
स्तवने तुझी गाती मुनी। गुंफूनिया गुणकौतुके ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट — १९८२

जाग उद्धारिणी असुरताभक्षिणी ।
कामक्रोधापुढे सिद्ध व्हावे रणी ॥ धृ ॥

दंभ जो ठाकला ताड त्या मस्तका ।
रक्तरंगामधे रंगवी कार्मुका ।
त्रिशुळ घेई करी सोडवी मेदिनी ॥ १ ॥

मानवाचा रिपू मोहरूपी दुजा ।
दमन त्याचे करी गांजलीसे प्रजा ।
क्षाळ त्याला झणी नेत्र तडितेतुनी ॥ २ ॥

मत्सराने रिपू अंध झाला जगी ।
जीवना क्षाळितो वासनेच्या धगी ।
स्नान घाली तया तप्तरुधिरातुनी ॥ ३ ॥

संगीत : गजानन वाटवे १९७४

# उठि श्रीरामा

उठि श्रीरामा, पहांट झाली पूर्व दिशा उमलली ।
उभी घेऊनी कलश दुधाचा कौसल्या माऊली ॥ धृ ॥

होमगृही या ऋषिमुनींचे सामवेद रंगले....
गोशाळेतुन कालवडींचे दुग्धपान संपले ।
मंदिरातले भाट चालले गाऊन भूपाळी ॥ १ ॥

काल दर्पणी चंद्र दावुनि सुमंत गेले गृहा ।
त्याच दर्पणी आज राघवा सूर्योदय हा पहा ॥
वसिष्ठ मुनिवर घेऊन गेले, पुजापात्र राऊळी ॥ २ ॥

राजमंदिरी दासी आल्या रत्नदीप विझविण्या ।
ऊठ राजसा, पूर्व दिशेचा स्वर्णयज्ञ पाहण्या ॥
चराचराला जिंकुन घेण्या अरुणप्रभा उमलली ॥ ३ ॥

चित्रपट : ते माझे घर
संगीत : सुधीर फडके

१९६१

## रूप सावळे महाराव !

॥ रूप सावळे महाराव । त्याचे पंढरी हे गांव ॥
॥ पायी वाहे चंद्रभागा । पुंडलिका क्षेम सांगा ॥ धृ ॥

॥ झाली वैष्णवांची दाटी । इथे वैकुंठीच्या पेठी ॥
॥ हरिनामाचा वर्षाव । रूप सावळे महाराव ॥

॥ काय वर्णावे स्वरूप । देवभक्त एकरूप ॥
॥ कानी कुंडलांची प्रभा । गळा वैजयंती शोभा ॥
॥ शोभे किरिटाचा प्रभाव । रूप सावळे महाराव ॥

॥ दोन हात कटीवरी । समचरण विटेवरी ॥
॥ खांब गरुडाचा सामोरी । दयासिंधू करुणाकारी ॥
॥ तुज भक्ताचे लाघव । रूप सावळे महाराव ॥

संगीत : सौ. कुमुद भट

१९८३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२६०७१
काव्य
२।३।८१

## अमृता अभया अनंता ....!

अमृता अभया अनंता । अंतरी आसावलो,
पावना परमेश्वरा प्रभु । पंढरीसी पातलो ।।

भेटीलागी जीव माझा । विठ्ठला वेडावला ।
तिमिर सारा भोवताली । संभ्रमाचा ठाकला ।
तूं सखा परिपूर्ण सविता । मी प्रकाशी थांबलो ।। १ ।।

ओळखीचे बंध अपुले । नेणिवेला माहिती ।
जाणिवेच्या अंतरंगी । भक्तिभावे नांदती ।
सूर तूं मी एकतारी । गीतरंगी रंगलो ।। २ ।।

दर्शनाची ओढ लागे । नेत्र बघती वाटुली ।
चालताना मार्ग लाभो । तव कृपेची साउली ।
दे हरी रे दान पदरी । मी अतिथी जाहलो ।। ३ ।।

संगीत : राम फाटक — १९६९

## घास घेई पांडुरंगा

घास घेई पांडुरंगा श्रीधरा अनंता ।
वेळ भोजनाची झाली त्वरा करी आता ॥ धृ ॥

सिद्ध करी माझी माता सहा रसे स्थाली ।
क्षीर सात्विकाची हाती तिच्या गोड झाली ।
अन्न ब्रह्मरूपा यावे अगा विश्वनाथा ॥ १ ॥

कटीवरी दोन्ही कर हे जरा सोडवावे ।
कण्या रांधल्या भक्तीने मुखी घास घ्यावे ।
तुझ्या कृपेने हे लाभे अन्न मायताता ॥ २ ॥

कृष्णरूप घेऊन येई दीन मी सुदामा ।
मंदिरात तुझिया आलो अगा घनश्यामा ।
प्रेमरूप या भक्तीचा तूंच एक ज्ञाता ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९७१

# ज्ञानेश्वर समाधी

पंढरीचा पोहा आळंदीसी आला ।
ज्ञानदेव झाला समाधिस्त ॥

स्तब्ध धरा झाली स्तब्ध इंद्रायणी ।
कैवल्याची गाणी अनाहत ॥

अगोचर झाले दृष्टीला गोचर ।
देव ज्ञानदेव स्वये झाला ॥

वैखरीसी आली वेदरूप ख्याती ।
जनलोका हाती ज्ञानेश्वरी ॥

अमृताच्या ताटी मौक्तिकांचा घास ।
निर्गुणाचा वास अंगिकारी ।

तेज प्रकाशले पुंजाळली काया ।
मोह दंभ माया शांतवीली ॥

चिदानंद झाली अश्वत्थ सांवली ।
दीनांची माऊली ज्ञानदेव ॥

संगीत : राम कदम १९८८

# ऊठ विठ्ठला, उठि गोपाला

ऊठ विठ्ठला उठि गोपाळा, उठले चराचरु ।
प्राचीवरती प्रकाश फुलला, उठला बघ दिनकरु ॥ धृ ॥

विहंग उठले उठल्या धेनू, गोऱ्हे कालवडी ।
मार्ग लक्षिती तव शिखराचा, पुण्यवंत कापडी ।
कीर्तनरंगी आळविती तुज, नारदमुनी तुंबरू ॥ १ ॥

जागे झाले पुंडलिकाचे, मायतात सज्जन ।
प्रभातकाळी तुज भक्तांचे, घडण्या मुखदर्शन ।
कुणी काकडा घेऊन आले, आरतीस सत्वरू ॥ २ ॥

फूल उमलते जसे कळीतुन, उघडी नयनदले ।
तेजोमय दीपातुन जैसे, तिमिरी तेज फुले ।
संतजनांचा आनंदाचा, परिसावा गजरू ॥ ३ ॥

संगीत : राम फाटक १९६९

## मन गाभारा, गाभारा....!

मन गाभारा, गाभारा। मधे उभा पांडुरंग।
डोळीयाचे जलकुंभ। स्नान घालिती अभ्यंग ॥ धृ ॥

सदा कानी नामघोष। हाती चिपळ्यांचा ताल।
आणि अभावित झाले। पाय घुंगुराळे चाळ।
हरी कीर्तनात साऱ्या। श्रुति जाहल्या सर्वांग ॥ १ ॥

दिंड्या पताका जाहले। अगा दोन्ही माझे बाहू।
सखा श्रीरंग सावळा। सदा सर्वांगाने साहू।
स्वर वेणूचे कौतिक। शब्द जाहले अभंग ॥ २ ॥

आता कासयाची चिंता। मोक्ष आणि कैवल्याची।
विष्णूपद उमटले। साक्ष आहे पंढरीची।
युगे अठ्ठावीस झाली। चंद्रभागेला तरंग ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८४

# श्रीहरी भक्तीने भेटतो....!

हवी कशाला दीर्घतपस्या कष्टपूर्ण मार्ग तो,
श्रीहरी भक्तीने भेटतो ॥ धृ ॥

अंतरातले गाव प्रभूचे,
कां अंधारी शोधायाचे ?
अंश ईश्वरी नरदेही या आनंदे नांदतो ॥ १ ॥

मोक्षासाठी उगाच वणवण ।
ईशपूर्ण देहाचा कणकण ।
दर्पणातल्या प्रतिबिंबातून ज्ञानवंत पाहतो ॥ २ ॥

स्वर्ग पृथ्वीच्या मधले अंबर ।
सर्वार्थाने सारे निळसर ।
निर्वाताच्या पोकळीत या हटयोगी पोहतो ॥ ३ ॥

भक्तीयोग हा योगामधला ।
गीतेने मनुजाला दिधला ।
श्रेष्ठ मार्ग सारथी रथाचा योध्याला सांगतो ॥ ४ ॥

संगीत : राम फाटक १९६९

# आम्ही विठुरायाची कुळे....

आम्ही विठुरायाची कुळे ।
फुलवितो मधुभक्तीचे मळे ॥ धृ ॥

राव आमुचा पंढरीनाथ ।
त्याचे पिकले अवघे शेत ।
डुले कणसावर पोवळे ॥ १ ॥

फिरे विवेकसा नांगर ।
तण मोहरूप ये वर ।
क्रोध क्षमावंत जाहले ॥ २ ॥

वाहे नामरसाचा पाट ।
त्यासी भीमेचा पै थाट ।
लोभ दंभासी बुडविले ॥ ३ ॥

ही घ्यावी आपुली रास ।
द्यावे दर्शन इतुकी आंस ।
वेचू अमृतकण कोवळे ॥ ४ ॥

संगीत : कुमुद भट

१९७०

## उभा देव पांडुरंग!

माझ्या मनाच्या राऊळी उभा देव पांडुरंग।
कुणी म्हणती विठ्ठल कुणी म्हणती श्रीरंग।। धृ ।।

चंद्रभागा डोळीयात नामघोष पै मुखात।
कानी कीर्तन गजरू मना कशी मी आवरू ?
पुंडलिकाच्या हातीची वीट जाहली अभंग ।। १ ।।

दिंड्या पताकांचा थाट सोऽहं भावाचीच वाट।
क्षेत्र क्षेत्रज्ञ घेतसे इथे अवतार आठ।
आणि नामाच्या अमृते मन जाहले निःसंग ।। २ ।।

रूप सावळे शोभते सदा माझ्याशी बोलते।
पुढे पंढरीची वाट माझ्या पायांना दावते।
एक एक पावलात होई निष्प्राण अनंग ।। ३ ।।

संगीत : सौ कुमुद भट १९८४

## अंगणात आल्या चिऊ.... !

अंगणात आल्या चिऊ, संदेशु घेऊनी ।
रुंजी घालितो वारीया, भीबरेवरूनी ॥ धृ ॥

शीळ वर्तते कवतीक, माधवाचे कानी ।
निराकार साकारेना, आले डोळियासी पाणी ॥ १ ॥

रांगोळीशी ठेवियले, चार घास तांदळाचे ।
नैवेद्याच्या वाटीतले, दूध संपले ना कैचे ॥ २ ॥

इथे दारवंटी नांदे, निर्गुणाची खेव ।
तिचा सापडेना ठावो, खंतावला जीव ॥ ३ ॥

येई येई वेगे आता, दर्शनासी द्यावे ।
अनाहतापुढचे अवघे, भाव आकळावे ॥ ४ ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९७५

# संतासंगे भीवरेवरती !

संतासंगे भीवरेवरती खेळायाचा खेळ ।
पंढरीनाथा, या संसारी परी घालतो मेळ ।। धृ ।।

आमुच्या हाती उरले नाही देहाचे बंध ।
मोक्षाघरच्या मार्गावरती आम्ही स्वच्छंद ।
कोणी म्हणती भ्रमिष्ट कोणी कोणी वेडावे ।
सदा मुखाने आम्ही देवा तुझे नाम घ्यावे ।
सुटला चेंडू हातामधुनी झेलशील तूं झेल ।।
पंढरीनाथा या संसारी परी घालतो मेळ ।। १ ।।

सदैव भवती दहा पाहुणे खंत न आम्हासी ।
घरात असुनी मनोमनी आम्ही पंढरपूरवासी ।
नामरूप हे अन्न आपुल्या नैवेद्या देवा ।
जन पोटार्थी सारे करिती क्षुधारूप हेवा ।
पाठीवरती मांडे घडती नको तूप ना तेल ।
पंढरीनाथा या संसारी परी घालतो मेळ ।। २ ।।

या घरव्याचे व्हावे राऊळ नगरी पंढरपूर ।
सभोवताली मधुभक्तीचे वर्तावे सुस्वर ।
दिवसारात्री अखंड व्हावे देवाचे दर्शन ।
पहाटसमयी भरूनी जावे काकड्यास अंगण ।
गुणकर्माची बहरून यावी दारापुढती वेल ।।
पंढरीनाथा या संसारी परी घालतो मेळ ।। ३ ।।

१९७१

# देवाच्या कवाडी.... !

देवाच्या कवाडी, आम्ही सोयरे वऱ्हाडी ।
राबाच्या बिऱ्हाडी, पाहुणेर ॥

कासयाची चिंता, आम्हा प्रपंचाची....?
खूण ज्ञानियाची, वोळखावी ॥

येथ नाही नाही, अज्ञान अंधार ।
ज्ञानाचे भांडार, फोडियेले ॥

संतांचे सांगणे, मिरविता माथी ।
प्रकाशती राती, पूर्ण तेजे ॥

दर्शनाची आस, अहोरात्र मनी ।
जनी जनार्दन, शोधितसे ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९७४

## आम्ही राजियांचे राजे!

आम्ही राजियांचे राजे आम्ही कुबेराचे।
एक पांडुरंग मित्र आम्हा जगी॥

पंढरीस अमुची पेढी घेतो नामाचेच व्याज।
घरी सावकारी काज मांडियेले॥

दारी गायींचा कळप दूध तूप प्यावे रोज।
नामामृती तया साज लाभतसे॥

दहा दिशांच्या पेठात पटे आमुचीच हुंडी
अहो विठ्ठलाची दिंडी दारी उभी॥

संगीत : वसंत देसाई १९६६

## अवघे जन आम्हा.... !

अवघे जन आम्हा, देवरूप झाले ।
परब्रह्म ठेले, दारवंटी ॥

अहोरात्र मनी, देवाचे सान्निध्य ।
आदि, अंत, मध्य, लोपावले ॥

उजळे आकाशी, ज्ञानरूप तेज ।
निर्गुणाची सेज, मांडियेली ॥

पौर्णिमेचा चंद्र, मनासि विश्राम ।
सीतळला काम, क्रोध सारा ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८३

## जैसी स्थिती आहे....!

जैसी स्थिती आहे, तैसे ठेव देवा ।
आणिकांचा हेवा, नाही आम्हा ॥

सोयरे सज्जन, असोत सांगाती ।
भोजना अतिथि, अभ्यागत ॥

अहोरात्र मनी, तुझे संकीर्तन ।
भरावे अंगण, श्रोतयांनी ॥

दुरिताची येथे, नको कृष्णछाया ।
मोह दंभ माया, वोसंडावे ॥

संगीत : सौ. कुमुद भट १९८३

# ज्ञानेश्वर महती

अगा ज्ञानदेवा अगाधा अनंता ।
तुझ्या पायरीशी सदा नम्र माथा ।। धृ ।।

जिथे ज्ञान विज्ञान संजीव होते ।
जिथे योग विद्येस सामर्थ्य येते ।
तिथे मानवाला मिळे मोक्षगाथा ।। १ ।।

नवे फूल अश्वत्थ वृक्षास आले ।
तिथे गीत ओवीसवे वेद झाले ।
तुझ्या शब्द शब्दांत सायुज्य नाथा ।। २ ।।

तुझ्या मंदिरी आर्त जीवास तृप्ती ।
तुझ्या दर्शने भक्त स्वानंद घेती ।
श्रुती धन्य झाल्या तुझे गीत गाता ।। ३ ।।

तुझ्या संगतीने फुले ज्ञानवेली ।
तुझ्या राऊळी भक्तीची मांदियाळी ।
नवे पीठ येथे मिळे विश्वनाथा ।। ४ ।।

१९७५

## गणेशस्तवन

सोनियाचा किरीट माथी ।
गदा पद्म शूळ हाती ।
पुढे मोदकांची वाटी,
गणेशू वंदावा ॥ धृ ॥

एकदंत लंबोदर ।
गजशुंड श्री ओंकार ।
आनंदाचा सर्वेश्वर,
गणेशू वंदावा ॥ १ ॥

विनायक आदिदेव ।
सकल वैभवाची ठेव ।
अमृताची मधुरा खेव,
गणेशू वंदावा ॥ २ ॥

माता प्रदक्षिणा एक ।
सर्व पृथ्वीची कारक ।
गुणाधीश तो तारक,
गणेशू वंदावा ॥ ३ ॥

संगीत : सौ. कुमुद भट　　　　१९८६

## गोंधळ. . . . !

मूळ प्रकृती अंबे, गोंधळा येई वो जगदंबे ॥ धृ ॥

तुझियासाठी पाजळिला हा प्राणांचा पोत ।
दुःख दुरित या जळती दिवट्या भवती तिमिरात ।
सभोवताली दैत्य माजले, माणूसरूपात ।
तयास दावी रूप अंबिके, रौद्रस्वरूपाचे ॥ १ ॥

माणूस पायी आज तुडवतो, माणूस धर्माला ।
खीळ घालण्या येई माते, त्याच्या कर्माला ।
पुत्र आईला खाऊन टाकी, बंधू भावाला ।
स्वार्थामधुनी जळुनी जाते, रूप ईश्वराचे ॥ २ ॥

जगण्यासाठी साधे जीवन, कलह सदा चालतो ।
जो तो अपुल्या रूपापुरता, आरशांत पाहतो ।
धर्मनीतीला धनामागुती बाजारी मांडतो ।
सगुण स्वरूपी दर्शन देई, मोक्ष कल्पनेचे ॥ ३ ॥

पारंपरिक                                        १९७४

# जोगवा....!

शांतिसुखाचा जोगवा, सात्त्विकवृत्ती जोगवा ।
मायभवानी जोगवा हा, सुविचारांचा जोगवा ॥ धृ ॥

शाकंभरी भूमी पिकवी, कात्यायनी दंभा शमवी ।
शमा दमाला क्षाळ माते, माहेश्वरी भक्ता सुखवी ॥ १ ॥

त्रिशूळ घेई पुन्हा करी, दुरिताचा निःपात करी ।
गरुडवासिनी दया करी, जन अज्ञांचा उद्धार करी ॥ २ ॥

ऐंद्री देवी पाऊस दे, पृथ्वीला गर्भांकुर दे ।
सकल सुभगता मंगल दे, अमंगलाला हाकलून दे ॥ ३ ॥

सगुण स्वरूपी दर्शन दे, पुत्रदायिनी सुपुत्र दे ।
यशकीर्तिच्या पुढचा माते, चिरशांतीचा सुस्वर दे ॥ ४ ॥

संसाराचा अर्थ नवा, प्रेमरसाचा झरा हवा ।
माणूसधर्मी आचरणाचा, सार्वत्रिक मधुघोष हवा ॥ ५ ॥

मायपित्यांचे प्रेम हवे, स्नेहशील सन्मान हवे ।
तुझ्याकृपेची सदैव धारा घरोघरी सौभाग्य हवे ॥ ६ ॥

इतुका माझा जोगवा, माते पदरी घालावा ।
आनंदाचा सांगावा हा, कान देऊनी ऐकावा ॥ ७ ॥

चाल : पारंपरिक १९७४

# हिमालयाचे मनोगत

तव भरले वेड्या पापाचे शत घडे ।
मी सिद्ध लेऊनी पराक्रमाचे कडे ॥
हे पराक्रमाचे कडे ॥ धृ ॥
तूं सुपुत्र कसला मूढा दानववृत्ती ।
तव मुखी वल्गना अहंपणा रे रक्ती ।
या विश्वामधला तूं तर कण मातीचा ।
मी उभा हिमालय करूनी तट छातीचा ।
तूं घालशील जो घाव त्याहुनी माझे उत्तर चढे । हे पराक्रमाचे कडे ॥ १ ॥
येथील संस्कृती आहे भगीरथाची ।
तू भिंत मिरविसी प्रतीक दुर्बलतेची ।
मी धवल धारितो भारत इतिहासाचे ।
तूं वृथा कवळिशी मृत्कण पीनत्वाचे ।
घे पाऊल अपुले मागे जरी ते पडलेले वाकडे । हे पराक्रमाचे कडे ॥ २ ॥
जरि समाज मानस इथले थंड विचारी ।
माझ्यासम आहे आतुन प्रलयंकारी ।
ही फुटतील कवचे जेव्हा मनशांतीची ।
तूं बघशिल रूपे रुधिरातील रुद्राची ।
जाणीव ठेव ही मनी माझिया कणात तडिता दडे। हे पराक्रमाचे कडे ॥३॥
तूं पायाखाली जे जळते ते पहा ।
तव घरास पडली खिंडारे बघ दहा ।
हा लोभ कशाला धरिसी नवभूमीचा ।
आदेश विसरशी बुद्धाच्या तत्वाचा ।
ही शेवटची तुज वेळ घालतो धर्माचे साकडे । हे पराक्रमाचे कडे ॥ ४ ॥

संगीत : यशवंत देव — १९६२

## पराक्रमाच्या या भूमीची....!

भाळी लावुन माती आता,
मृत्यूला आव्हान करू ।
पराक्रमाच्या या भूमीची
पराक्रमाने पूजा करू ॥ धृ ॥

वंशज आम्ही भगीरथाचे ।
हात आमुचे पोलादाचे ।
एकसंघता कार्य आमुचे ।
शत्रु सीमापार करू ॥ १ ॥

समुंद्रमंथन ध्येय आमुचे ।
प्राशन करणे हलाहलाचे ।
पूजक आम्ही शिवशंभोचे ।
रुद्राचे अभिधान करू ॥ २ ॥

गतशतकांच्या सुवर्णरेखा ।
सम्राटांच्या असंख्य शाखा ।
धर्माच्या उभवुनी पताका ।
बुद्धाला शिल्पांत स्मरू ॥ ३ ॥

आम्ही मावळे शिवरायाचे ।
तानाजीचे अन् बाजीचे ।
सामर्थ्यासह दृढ निष्ठेचे ।
गनिमावरती घाव करू ॥ ४ ॥

१९६२

## जय मृत्युंजय.... !

भारत अवघा शिवदेवालय ।
जय मृत्युंजय, जय मृत्युंजय ॥ धृ ॥

तिन्ही दिशांना निळसर सागर ।
शिरी शोभते घन निलांबर ।
शततीर्थांचा हृदयी संचय ।
जय मृत्युंजय, जय मृत्युंजय ॥ १ ॥

वैदिक गंगा माथ्यावरती ।
भगीरथाची ती भागिरथी ।
नद्या सर्वही करिती अनुनय ।
जय मृत्युंजय, जय मृत्युंजय ॥ २ ॥

पुनश्च घ्यावा जन्म भारती ।
पुन्हा जगावी येथिल शांती ।
पुनश्च व्हावे मंथन चिन्मय ।
जय मृत्युंजय, जय मृत्युंजय ॥ ३ ॥

संगीत : राम फाटक  १९७२

# भारतभूचे निज संरक्षक !

भारतभूचे निज संरक्षक,
मातीचे कण इथले सैनिक ॥ धृ ॥

नद्या येथल्या पर्वत धरती,
स्वातंत्र्याची स्तोत्रे गाती ।
ध्येयाच्या मार्गावर पुढती,
ध्रुब ताऱ्याचे मानव पूजक ॥ १ ॥

सजीव इथली चित्त प्रेरणा,
समतेची नव राष्ट्रधारणा ।
सिद्ध येथल्या तनूतनूतिल,
रुधिराच्या लाटाही पावक ॥ २ ॥

या भूमीवर घडले भारत,
गर्वाचे पडले ऐरावत ।
येथ निपजला द्रष्टा कोणी,
उपनिषदांचा कर्म निवेदक ॥ ३ ॥

भारतभूमी श्रेष्ठ शिवालय....!
पृथ्वीवरचे दुजे भवालय....!
भारतीय ही स्फूर्ति चिन्मय....!
कुटिलापुढती सदा प्रभंजक ॥ ४ ॥

संगीत : राम फाटक

१९७२

## युद्ध भेरि गर्जती....!

युद्ध भेरि गर्जती दुंदुभी निनादती ।
संगरार्थ शूर वीर चालले रणाप्रती ।। धृ ।।

भारतीय अस्मिता नीतिधैर्य शांतता ।
शत्रू ठाकला पुढे दानवीय क्रूरता ।
मृत्युदंड त्याजला ध्येय एक संप्रती ।। १ ।।

कंठकंठ छेदिणे शत्रूसैन्य ताडणे ।
सार्वभौम भारता सार्वभौम राखणे ।
विजयस्वप्न भूमीचे पेशी पेशी पाहती ।। २ ।।

एकराष्ट्र भावना अंतरात नांदते ।
सर्व धर्म मिसळुनी एक सैन्य चालते ।
स्फूर्तिदायी चेतना तनू तनूत जागती ।। ३ ।।

कुटिल नीति ठेचणे राष्ट्रकार्य जाहले ।
भीम पार्थ होऊनी भारतीय ठाकले ।
विकसनार्थ भूमीच्या रुधिरपाट बाहती ।। ४ ।।

संगीत : सौ. कुमुद भट १९७२

# भारतीय हा धर्म आमुचा !

भारतीय हा धर्म आमुचा भारतीय ही अस्मिता ।
धर्मभू ही कर्मभू ही जन्मभू ही देवता ।। धृ ।।

वर्ण पंथा जातिपुढची भारतीय ही संस्कृति ।
एकतेचा मंत्र म्हणुनी येथ सारे नांदती ।
प्रलय होवो, स्फोट अणूचे रक्षिणे ही एकता ।। १ ।।

येथ गंगा काशिची जन वाहती रामेश्वरी ।
येथली उत्तुंग शिखरे स्थान शंभोची खरी ।
अंतरी नांदे हिमालय नेत्री सागर शांतता ।। २ ।।

येथ द्रष्टे अन् महात्मे कृष्णगीता सांगती ।
परम स्वार्थाहून मोठा कर्मयोगा मानिती ।
कर्मयोग्या मृत्यू अवघी मोक्षदायी सांगता ।। ३ ।।

मंदिरे गुरुद्वार मशिदी प्रार्थनास्थळ कोणचे ?
हृदय अवघ्या मानवाचे संस्कृती ही सांगते ।
तेथ जन्मे निर्मितीची विकसनाची भव्यता ।। ४ ।।

संगीत : सौ. कुमुद भट

१९८४

## तीन सागर एक होती !

तीन सागर एक होती दक्षिणेला सर्वदा ।
एकतेचा मंत्र अमुच्या अंतरी घुमतो सदा ।। धृ ।।

पाच बोटे एक होता वज्रमुष्टी बनविती ।
पाऊले एकापुढे नित राजमार्गी चालती ।
दोन बाहू वाढवीती व्यक्तिची बलसंपदा ।। १ ।।

सर्व जाती अन् जमाती राष्ट्रकार्यी लावणे ।
धर्मपंथा भारतीय ही अस्मिता नित सांगणे ।
एक कोणी शक्य नाही दूर करणे आपदा ।। २ ।।

स्पंदने हृदयांतरीची एकमेका उमगती ।
वेदकालापासूनिया ऋषिमुनी नित सांगती ।
गौरवाने सर्व मिळुनी पूजिणे श्रीमोक्षदा ।। ३ ।।

१९८४

## हिमालयाचे मनोगत ?

त्रिशूळ दंडधारी मी, त्रिपुंड्र भस्म रेखितो ।
दंभ पाप क्षाळण्या, पुन्हा त्रिनेत्र रोखतो ॥ धृ ॥

युगे युगे व्रतस्थ मी, समाधी योग लाविला ।
स्वरूप शांत पाहुनी भंग कोणी इच्छिला ।
विश्वशांती रक्षिण्या हलाहलास प्राशितो ॥ १ ॥

क्रूर दानवास मी, रौरवात धाडिले ।
कुटिल हेतु इच्छुगा, मस्तकास ताडिले ।
सहस्र योजने दुरी, मदन मीच जाळितो ॥ २ ॥

योग भक्तीने कुणा, मी प्रसन्न होतसे ।
मनात आंस जाणुनी तयास अस्त्र देतसे ।
जरी सुभक्त माजला तया कृपाण मारितो ॥ ३ ॥

सत्त्व धीर मानवा, मी प्रशांत भासतो ।
राजसा कपाळी मी, राजयोग रेखितो ।
तामसास ताडुनी त्रिगुणरूप दावितो । ४ ॥

संगीत : रवीन्द्र भट १९६३

# उठा राष्ट्रवीर हो ! !

सज्ज व्हा उठा चला । सशस्त्र व्हा उठा चला....
उठा राष्ट्रवीर हो ॥ धृ ॥

युद्ध आज पेटले । जवान चालले पुढे
मिळुन सर्व शत्रूला रणात चारुया खडे ।
थोर वंश आपुला । महान मार्ग आपुला ॥ १ ॥

बाल वामनापरी । त्रिखंड सर्व जिंकुया ।
मन्यूबाळ होऊनि । रणात मृत्यू झेलूया ।
बाल रामकृष्ण व्हा । समर्थ व्हा पुढे चला ॥ २ ॥

मान ताठ आपुली कुणापुढे न वाकली ।
वीरता शिवाजीची नसानसांत साठली ।
दिव्य ही परंपरा जगास सांगू या चला ॥ ३ ॥

आई आज संकटी रणात देऊ आहुती ।
मातृभूमिची करू जगात आज आरती ।
एकसंघ होऊनि पुढे चला पुढे ॥ ४ ॥

चित्रपट : हा माझा मार्ग एकला
संगीत : सुधीर फडके

१९६२

## इथे पेटलेली सदा यज्ञकुंडे

इथे पेटलेली सदा यज्ञकुंडे किती प्राण वेदीवरी ठाकले ।
कसे देशभक्तांस वेडे म्हणावे दिवास्वप्न त्यांनी जरी पाहिले ॥ धृ ॥

नको सार संसार सौभाग्य दारा नको वैभवाची गुलामी कथा ।
पुरे जाहले मानसन्मान खोटे पुरे मैत्रिच्या वल्गनाही वृथा ।
जरी गांव सारे निद्रिस्त होते कुणी संयमाने इथे जागले ॥ १ ॥

असे पिंजरा भोवती आंधळ्यांचा सुवर्णात आनंद ते मानिती ।
परी येथले कोणी स्वातंत्र्यवेडे निळे मुक्त आकाश स्वीकारिती ।
करी तापलेल्या सवित्रास घेणे अशा दिव्यक्रीडा कुणी खेळले ॥ २ ॥

व्यथा साहलेल्या किती कोठड्यांनी कथा स्फूर्तिच्या जाहल्या त्या जगी ।
कुणी पाशवी कोल्हू दंडास साही उपाशी कुणी टांगलेले धगी ।
असे वीर स्वातंत्र्यप्रेमार्थ अंती हुतात्मा स्वये आहुती जाहले ॥ ३ ॥

१९७३

## कंठात सूर माझ्या....

कंठात सूर माझ्या ओंकार ठेव देवा ।
आभाळ भेदुनी मी तो नित्य नित्य गावा ।। धृ ।।

मी सत्य सात्विकाची गाथा सदैव गावी ।
विश्वात स्थैर्य शांती त्यातून जन्म घ्यावी ।
प्राचीन मी ऋषींचा संदेश आळवावा ।। १ ।।

मातीत बीज रुजते त्याचाच वृक्ष होतो ।
उपभोग सावलीचा प्रत्येक पथिक घेतो ।
माझ्याच निर्मितीचा आधारवृक्ष व्हावा ।। २ ।।

उपभोग ऐहिकाचे सारे विरून जावे ।
माझ्यामधील तुझिया रूपास मी पहावे ।
हा शब्दयज्ञ अंती हृदयी सदा घडावा ।। ३ ।।

१९८५

आज मांडियेला यज्ञ, भूर्जपत्री वेदीवर ।
लेखणीच्या संघर्षात, यज्ञदेवा, व्हावे स्थिर ॥
आज मांडियेला यज्ञ, गातो अनुभूती ऋचा ।
माझ्या आगळ्या यज्ञाचे, नवे कुंड, नवा साचा ॥
आज मांडियेला यज्ञ, देतो अर्घ्य वेदनेचे ।
साऱ्या अरिष्टांची शांती, ऋचा गीत संस्कृतीचे ॥
आज मांडियेला यज्ञ, अध्वर्यु गा माझा मीच ।
सामगायनी रंगली, माझी चातकाची चोच ॥
आज मांडियेला यज्ञ, अग्निदेवा, तोषवावे ।
द्यावे पायसाचे दान, माझ्या शब्दांत नांदावे ॥

१९५८

माझ्या मनींचे मळभ
संपता संपवेना ।
लपलेला चंद्र कोठे,
हरवला सापडेना ॥

उगा धावलो गर्वात,
सौंदर्याच्या, संपत्तीच्या ।
आत रडती वेदना,
जाणिवेच्या नेणिवेच्या ॥

आता रडती वेदना,
आशेलाही आग लागे ।
अभावाची ओढ थोडी,
वास्तवाला फास लागे ॥

भावनेच्या डोक्यावर,
बसे वास्तवाचे भूत ।
आणि तरी ओरडतो,
आम्ही लेखणीचे पूत ॥

लेखणी ही ओके शाई,
कागदांचा ढीग लागे ।
ढिगावर मोठेपण,
कोणाच्या कां येई मागे ?

अस्मिताही नाही जेथे,
तेथे कैचे मोठेपण ?
संस्कृतीच्या भट्टीमध्ये,
नीतीवर घाव्ह घण ।

१९५८

सळसळणारे असंख्य कुंतल,
घेऊन आलीस भल्यापहाटे ।
सुरू जाहली रात्र पुन्हा अन्,
उगाच माझ्या मनास वाटे ॥

सळसळणारे असंख्य कुंतल,
विसावले क्षण भाळावरती ।
धुंद सुगंधित उदबत्तीचा,
गंध धावला वरतीवरती ॥

सळसळणारे असंख्य कुंतल,
अजाण कोणी क्षणिक चुंबिले ।
सापडलेले अमूर्त क्षणही,
पुन्हा एकदा पळून गेले ॥

सळसळणारे असंख्य कुंतल,
उगाच रुसले गजऱ्याबरती ।
आणि मोगरा तरीही मरतो,
त्यांच्या गहिऱ्या गंधावरती ॥

१९५८

२६०१
काव्य २६०५१
२।३।६०

अशीच ओली रात्र असावी,
पागोळ्यांना कंठ फुटावा।
आणि कुणाच्या भिजल्या नेत्री,
मद्यामधला कैफ असावा॥

अशीच ओली रात्र असावी,
रातराणीला कंप सुटावा।
अंधाराच्या शेल्याआडुन,
कुणी कुणाचा सुगंध घ्यावा॥

अशीच ओली रात्र असावी,
आणि मनाला बंध नसावा।
शुभ्र मोगरी गजऱ्याआडुन,
नभाआडचा चंद्र हसावा॥

अशीच ओली रात्र असावी,
शृंगाराला कैफ चढावा।
महाकवीच्या हिमांगिनीला,
शापित कोणी यक्ष मिळावा॥

१९५९

आज अचानक आलीस,
ओल्या श्रावणी सरीत।
ओल्या पापणीत दडे,
माझ्या मनींचे गुपित॥

आज अचानक आलीस,
एका 'आले'च्या तोऱ्यात।
आणि दृष्टी अडखळे,
तुझ्या बावऱ्या चालीत॥

आज अचानक आलीस,
एक विसावा म्हणून।
एक स्मित मिस्किलसे,
खोटं कारण म्हणून॥

आज अचानक आलीस,
गंध मोगरी घेऊन।
माझ्या मनातील जाई,
आली देठांत फुलून॥

आज अचानक आलीस,
माझ्या सावळ्या मिठीत।
आणि सापडले कांही
तुझ्या ओठांच्या दिठीत॥

आज अचानक आलीस,
अशीच ये कधी तरी।
रोज असते ग आई,
पहाऱ्याला माझ्यावरी॥

१९५९

कधी तरी अर्ध्या रात्रीला,
धावत येशील माझ्यामागे ।
आणि उद्याची प्रकाशसमई
विझून जाईल ॥

कधी तरी अर्ध्या रात्रीला,
अर्धीमुर्धी ओळख होईल ।
अचेतनाची रुंद पापणी,
मिटून जाईल ॥

कधी तरी अर्ध्या रात्रीला,
हसेल लाजून शुक्रचांदणी ।
त्रिखंडातली शब्दप्रेरणा,
मुकीच होईल ॥

कधी तरी अर्ध्या रात्रीला,
उंच मनोरे मनांत उठतील ।
पुळणीवरती मनामनांच्या
फसेल सागर ॥

कधी तरी अर्ध्या रात्रीला,
चिरंतनाची घडेल संगत ।
सत्य शिवाची गूढ प्रेरणा,
पुलकित होईल ॥

कधी तरी अर्ध्या रात्रीला,
माझे 'मी' पण संपून जाईल ।
तुझ्या मिठीवर तुझी बंधने
विरून जातील ॥

१९६०

कशास आता गासी वेडे,
मनांत माझ्या घुमे भैरवी ।
नको आळवू मधुवंती ती,
हृद्यी माझ्या सूर शांभवी ।।

सतारीस त्या घाल गवसणी,
मला न उरले भान स्वरांचे ।
कणाकणांना मिठीत घेऊन,
मनी विखुरले भास क्षणांचे ।।

आभासाचे फूलपाखरू,
फुलाफुलावर करते क्रीडा ।
मधू संपता पुष्पामधला,
भृंग नाचतो उगाच वेडा ।।

लुटता काही शाश्वत सुंदर,
भृंग विसावे कमल मंचकी ।
इकडे योगी वाट पाहतो,
थेंब पडावा मुखी चातकी ।।

इकडे योगी वाट पाहतो,
"ब्रह्मास्मि अहं" असे म्हणोनी ।
हटयोगाच्या पडद्यावरती,
चित्र रेखितो रंग भरोनी ।।

म्हणून आता नको आळवू,
मधुवंतीचे सूर अनामिक ।।
ढळेल त्याच्या कंपनातुनी,
योग समाधी माझी सात्विक ।।

१९६०

कधी वाटते व्हावे डुक्कर,
अंगोअंगी घाण जिरावी ।
सत्य शिवाच्या पडद्यावरची,
आळसलेली धूळ सरावी ॥

सत्य शिवाच्या पडद्यावरची,
धूळ मारते असंख्य बाता ।
उपभोगाच्या बाजेवरती,
किती कुमारी होती माता ॥

उपभोगाच्या बाजेवरती,
तारुण्याला येते मस्ती ।
कुणी भिकारी पोर हिंडते,
भुकेजलेले रस्तोरस्ती ॥

कुणी भिकारी पोर हिंडते,
पोटासाठी उकिरड्यावर ।
सडके कुजके अन्न वेचता,
या रस्त्यावर, त्या रस्त्यावर ॥

सडके कुजके अन्न वेचतो,
त्या चिमण्याला सोबत व्हावी ।
म्हणून वाटते व्हावे डुक्कर,
अंगोअंगी घाण जिरावी ॥

१९६०

माझा लहानसा मेंदू,
काय वर्णू त्याची कथा ।
त्याची धारणा आगळी,
माझ्यावर आळ वृथा ।।

त्याची धारणा आगळी,
एका कप्प्यामधे कैफ ।
त्याच्या डोळ्यामध्ये धुंदी,
आणि विचारांत झेप ।।

त्याच्या डोळ्यामधे धुंदी,
आणि हृदयांत शल्य ।
यौवनाची हांक कोठे,
कोठे निरागस बाल्य ।।

यौवनाची हाक कोठे,
कधी अकाली वार्धक्य ।
त्याला स्वप्नामधे दिसे,
अशक्य ते होई शक्य ।।

त्याला स्वप्नामधे दिसे,
एक परी स्वर्गातील ।
आणि तिच्या डोळ्यामधे,
वत्सलता आईतील ।।

आणि तिच्या डोळ्यामधे,
कधी चांदणे फुलते ।
क्षणामध्ये कोठेतरी,
एक उल्का झेपावते ।।

क्षणामधे कोठेतरी,
होई सौदर्याचा भास ।
कधी त्याच्या नासिकेला,
येई असत्याचा वास ॥

कधी त्याच्या नासिकेला,
घाणेरीत गंध मिळे ।
कधी त्याच्या संगतीत,
जास्वंदीचा रंग गळे ॥

कधी त्याच्या संगतीत,
होई जगणे अशक्य ।
ईश्वराची वाटे भीति,
होई दानवांशी ऐक्य ॥

ईश्वराची वाटे भीति,
सत्य पळे दूर दूर ।
शिव घेई डोक्यावर,
खोट्या सौंदर्याचा भार ॥

असा लहानसा मेंदू,
काय वर्णू त्याची कथा ।
त्याची धारणा आगळी,
माझ्यावर आळ वृथा ॥

१९६०

माझ्या शब्दब्रह्मी आंता, नाही शब्दांना आधार ।
माझ्या मंथनात कशी, व्हावी वेदना साकार ?

माझ्या निळसर डोही, येतो कणा कणा पूर ।
एका भोवऱ्यात आंता, माझे वर्तुळले ऊर ।।

फिरे भीतीचा भोवरा, मनी ओढ खोल खोल ।
एका पापासाठी आता, देतो जीविताचे मोल ।।

उभी ओढ आवेगाची, एक पाश संस्कृतीचा ।
मनी मोहाचे मळभ, एक भाव सात्विकाचा ।।

कसे उकलावे गूढ, कशी उतरावी धुंदी ?
वरी पडदा हटेना, कशी आलापावी नांदी ?

एका काजव्याचा येथे, कसा पडावा प्रकाश ?
एका वल्ह्यावर कसा, माझा घडावा प्रवास ?

आज थबकलो पुरा, नाही पायामध्ये त्राण ।
वेध जिव्हारी लागला, नाही सापडला बाण ।।

उभ्या आकाशात वरी, पंख पडावे गळून ।
एक उल्कापात सूर, जावे मातीत मिळून ।।

उद्या अंधार संपेल, उद्या पौर्णिमा नांदेल ।
एका स्वप्नाळूचे स्वप्न, चिरनिद्रेत रंगेल ।।

माझ्या वेदनेस आता, नाही आकार, हुंकार ।
वेडे संवेदने थांब, नको घेऊ शब्दाकार ।।

१९६१

आज वाटते खाईमध्ये,
अंग स्वतःचे झोकुन द्यावे ।
पांघरलेले वस्त्र पांढरे,
चिखलामध्ये काळे व्हावे ॥

पांघरलेले वस्त्र पांढरे,
मुळी न साहवे आज मनाला ।
कसे रुचावे शशांक मीलन ।
अमावस्येशी अंधाराला ॥

कसे रुचावे शशांक मीलन,
प्रेमभंग तो अटळ भासतो ।
पहाटे पूर्वी स्वप्नामध्ये,
मीच स्वतःला उगा हासतो ॥

पहाटे पूर्वी स्वप्नामध्ये,
कुरूप, काळे, फिक्कटलेले ।
मला दिसावे स्वरूप माझे,
भोगासाठी आसुसलेले ॥

मला दिसावे स्वरूप माझे,
उगा फासतो मुखास रोगण ।
झूठ प्रसाधन, खोटा अभिनय,
मनांत माझ्या पापी स्पंदन ॥

झूठ प्रसाधन, खोटा अभिनय,
हेच आजचे माझे दर्शन ।
या साऱ्यांना खोल बुडविण्या,
हलाहलाचे घेतो चुंबन ॥

या साऱ्यांना खोल बुडविणे,
कार्य येवढे आज उरावे ।
नवे ध्येय अन् नवी संस्कृती,
यांच्या पाठी कुणी झुरावे ॥

नवे ध्येय अन् नवी संस्कृती,
हेच जाहले स्वप्न आजचे ।
गीतावाचन जगतासाठी,
नाटक करणे आयुष्याचे ।।

१९६३

आज भोवती अंधाराचा पडला पडदा ।
आणि मनांच्या सीमेवरती फसले पाऊल ।
खंत खेद अन् अनुतापाची नुरली चाहुल ।
ते फसणे हे तर माझे जीवन.
सौंदर्याच्या सन्मार्गाच्या सरल्या भिंती ।
अफाट सारे विश्व भोवती फसावयाला ।
नशा एकटी पुरे जाहली पंकामध्ये जगावयाला ।
ती नशा नशा हे माझे जीवन.
भावुकतेचा फाडुन बुरखा हसली कामुकता ।
काव्यबंधनी अनुतापाला जागा कुठली आता ।
काव्यावाचुन कवी हिंडतो वणवण सभोवताली ।
ती वणवण आता माझे जीवन.
व्यवहाराच्या जगांत झाले सुवर्ण मातीमोल ।
जग नियंत्रणाच्या आवर्ती का फिरू लागले गोल ?
मी आवर्तातील पाचोळ्याचे इवले पिकले पान ।
ते आवर्त जाहले माझे जीवन.
मी मिरवित टेंभा माझ्या क्षणिक अहंतेचा ।
घेऊन हिंडतो झेंडा कुठल्या शब्दभार वेडाचा ।
मी कोण ? कोठला ? गेलो कोठे ? न कळे ।
हा संभ्रम म्हणजे माझे जीवन.
हे काय कसे अन् कशास घडते कोठे ?
या प्रश्न बंधनी मनांत रुतती काटे ।
त्या कांट्यामधुनी निपजे नवी समस्या ।
ते प्रश्नसमस्या माझे जीवन.
ती नशा, आणखी वणवण, फसणे, वेड ।
हे चार वेद घडविती जीवनतेढ ।
या तिढ्यातुनी प्रगटावी अर्धी कविता ।
ही अर्धी कविता माझे जीवन.

१९६२

पुनश्च अडली आज लेखणी,
पुनश्च होतो तेथे आलो ।
उपभोगाच्या शरीरपंकी,
पुनश्च अंतर्बाह्य अडकलो ॥

उपभोगाची शरीरसंगत,
उभी रहाते समोर सत्वर ।
वृत्ती आणि विचारांमधे,
पुनश्च पडले अगम्य अंतर ॥

वृत्ती सांगे उपभोगा घे,
विचार सांगे आवर मोहा ।
काय अंतरू ? काय स्वीकारू ?
प्रेमगीत ? का अभंग, दोहा ?

भोगामागील तीव्र अहंता,
क्षणाक्षणाला फुलू लागली ।
दोह्यामधली सुरम्य सुमने,
आसवातुनी गळू लागली ॥

सुरम्य सुमने, मदिरभावना,
मनांत घडती तीव्र स्पंदने ।
क्षणांत वाटे देऊ झुगारून,
व्यवहाराची सर्व बंधने ।

व्यवहाराच्या बंधनातले,
अंतर्मन हे झाले व्याकुळ ।
गतायुषातील उगा आठवे,
पुनश्च अपुरे अधुरे गोकुळ ॥

काय सांगणे जुनीच गाथा,
कशास गाऊ जुनी पुराणे ।
अगम्य आसक्तीच्या मागे,
अंतर धावे आज दिबाणे ॥

१९६५

# सहा रिपू ....!

चालता चालता विसरते वाट ।
पुढे पडे गांठ कामनेची ॥

नसे इंद्रियांना कोणाचाच धाक ।
सदा मारी हाक क्रोधरिपू ॥

आवर मनाला कोण घालणार ?
साद घालणार लोभ दंभ ॥

स्वार्थाच्या लोभात मन गुंतवावे ।
स्वतःशीच गावे मोह गीत ॥

मोह आंधळयाला अंधारी पडावा ।
मुठीत काजवा मद त्याचा ॥

मदोद्धत बाणी जगा ऐकवावी ।
वैखरी बोलावी मत्सराची ॥

रिपू सहा ऐसे चालता टाळावे ।
अहोरात्र घ्यावे हरिनाम ॥

१९६६

# मोक्ष....!

ओढ पावसाची लागे मृत्तिकेस ।
सोडिते निःश्वास तापलेले ॥

तैसे सदा मन संसारी तापले ।
मोहात वेढले बासनेच्या ॥

वीज अंतराळी चमकून जावी ।
मुठीमध्ये घ्यावी कैशी तिज ॥

मुठीत मोकळा गवसे आभास ।
वाढतसे भूक सदा नवी ॥

गवताने घ्यावे वटवृक्षरूप ।
खेळ हा अरूप सदा चाले ॥

मनाला आवर कोण घालणार ?
अहंपणा जर गळे नोहे ॥

म्हणोनि संसारी असो भक्तीभाव ।
भावामागे देव येतो घरी ॥

१९६१

# डोहाळे....!

सांगण्यास जगा मज नाही लाज !
डोहाळ्याचे काज पुरविले ॥

संतदर्शनाचे लागले डोहाळे ।
किती वर्णू सोहाळे अलौकिक ॥

मनांत माझिया विठ्ठलाशी संग ।
कुशीत अभंग प्रकटावा ॥

वाटते चालावी पंढरीची वाट ।
वारकरी थाट लेवोनिया ॥

सदैव घडावे चंद्रभागा स्नान ।
तोचि गा सन्मान भाग्यपूर्ण ॥

नामाचीच कुंची नामाचेच बाळे ।
स्वरूप सांवळे गर्भामाजी ॥

सांवळे सगुण रूप जन्मा यावे ।
याच्याहुनी भावे नाही काही ॥

१९६९

# शर्विलक .... !

संतांच्या गृहिचे आम्ही शर्विलक ।
चिपळ्या असंख्य चोरियेल्या ॥

हाती पायी बेडी आम्हा संसाराची ।
महती नामाची चोरलीसे ॥

संसारात आम्हा सोयऱ्यांचा जाच ।
मोह दंभ काच पळविले ॥

तुम्ही दरबारी शिक्षा द्यावी देवा ।
पाऊलांशी ठेवा सर्वकाळ ॥

मग आम्हा नुरे भूत वर्तमान ।
भविष्याची जाण लुप्त होई ॥

घटी पळा होती नामरूप देवा ।
कांसयाचा हेवा मानायाचा ॥

समोरी मागुती ब्रह्म साकारले ।
आत्म्याची पाऊले जाणवती ॥

नांव गांव सारे संवेदनाशून्य ।
श्रुति सूर अन्य विसरल्या ।

ऐसी शिक्षा आता भोगावी आनंदे ।
आळवू स्वानंदे स्वयंरूप ॥

१९६९

असेच मीरा असेल प्याली,
हलाहलाचे घोट अभावित ।
सभोवताली सामान्यांचे,
ऐकुन वेडे भविष्य भाकित ॥

सभोवताली सामान्यांना,
बंधन कोते उंबरठ्याचे ।
कसे दिसावे या कैद्यांना,
तेज अलौकिक अनामिकाचे ॥

कसे दिसावे या कैद्यांना,
मुक्त मनाचे स्वप्न अलौकिक ॥
हरिकृपेविण तडफडणारे,
हरिभक्तांचे जीवन भाविक ॥

हरिकृपेविण तडफडणारी,
मीरा प्राशुन घेई हलाहल ।
वीष परंतु अमृत झाले,
मोक्षाद्वारी पडले पाऊल ॥

वीष परंतु अमृत झाले,
बुडणाऱ्याला तारायाला ।
अभंग झरती त्याच्यामधुनी,
मीरा माधव घडवायाला ॥

१९७०

# शोध

रात्र कभिन्न काळी....
सकाळ होणारच नाही कां ?
हरवलेला माझा मी,
कधी दिसणारच नाही का ?

हरवलेला माझा मी,
जेव्हा जवळ होता,
त्यावेळी जगण्यात राम होता.
रंगात गंध होता, गंधात रस होता.
रसात रूप होतं, संवेदनेचं.
शेजाऱ्याचं दुःख माझं,
माझा आनंद त्याचा.
अंगणातला परिजात,
शेजारघरी पायघड्या घालायचा.

माझी अन्नपूर्णा शेजारघरी रांधायची.
बाळगोपाळ म्हणायचे,
तृप्त झालो !
टेबलावरचा पेरू झाडावरचा पोपट टोकरायचा.
म्हणायचा, पुढच्या जन्मी झाड हो !
मेलेल्या कपिलेच वासरू,
माझ्या हाती दूध प्यायचं.
मला ढुसणी देत म्हणायचं,
पुढच्या जन्मी कामधेनू हो !
संतोष. पूर्वसत्य गवसल्याचा !
अनाहताच्या तालावर एक नर्तन.
एक पाऊल पुढे, एक पाऊल मागे !
नाचता नाचता भोवंड.

अडखळला पाय.
अन्नापूर्णा आक्रोशली.
बाळ हवं, आपलं बाळ।
मृत्यूनं कवेत घेतलं आहे.
हटकलं मृत्यूला.
तो म्हणाला, बाळ देतो. तू चल.
**वासांसि जीर्णानि यथा विहाय।**
**नवानि गृण्हाति नरोपराणी॥**
जीर्णाचा लोभ सुटला नाही.
दिवसा अंधार झाला. गडद,
अधिक गडद!
बाळ सूर्यमंडळात झेपावतोय.
माझे दोन्ही बाहू निष्प्राण. अचेतन
आता सकाळ कधीही होणार नाही.
कधीच नाही ....!

१९७२

## मा तुझ्यावाचून सखये,

मी तुझ्यावाचून सखये,
एकटा कोणीच नाही।
शब्द सारे गोठलेले,
वाटते वाणीच नाही ॥ धृ ॥

या प्रमाथी वागण्याचे,
अर्थ सारे शून्य झाले।
सोयरे सारे तुझ्याविण,
दूरचे अन् अन्य काही ॥ १ ॥

सर्व क्षण एकांत झाले,
भ्रांत त्यांची कां पडे ?
आठवांच्या मी नदीला
वाळले निर्माल्य वाही ॥ २ ॥

आज भ्रांती कां पडावी
कोण मी अन् कोण तू ?
मी जरी कोशांत माझ्या,
अक्षरे गुंफीत राही ॥ ३ ॥

अक्षरांचा सूर त्या,
अर्थासवे गुंफीत जातो।
दूर तूं गेलीस, मी अन
अक्षरे हरवून जाई ॥ ४ ॥

हरवले अस्तित्व सारे,
आज झालो मोकळा।
शून्य भंवतालामधे, मी
पूर्ण तुझिये रूप साही ॥ ५ ॥

१९८८

अरे आळंदीच्या ज्ञान्या, काय गाढ झोपलासी ?
तुझ्या नामाची महती, तुला साहवेना कैशी ?

काय तुलाही लागला, माझ्या शतकाचा गुण ?
काय तुझ्या अश्वत्थाची, गेली सावली पुसून ?

तुझ्या नामावीण कैसे, मुखी घास घालायाचे ?
पिसे जिवाला लागले, तुझ्या गुण कीर्तनाचे ।।

आता होई होई जागा, मला कळ सोसवेना ।
कशी पाहशी निष्ठुरा, ब्रह्मविद्येचीच दैना ।।

योगियांचा योगी भूतव्यासी आला ।
ज्ञानदेव डोळा पाहू चला ॥

इंद्रायणी कांठी अश्वत्थ सांवली ।
धृती पूर्ण झाली हरिपाठे ॥

डोळियांचे ज्ञान रसनेसी झाले ।
श्रवणासी आले आत्मज्ञान ॥

दुष्ट दुष्ट सारे मानवी आभास ।
सुखाचा प्रवास कैवल्याचा ॥

कैवल्याचे धाम संजीवन झाले ।
ज्ञानदेव झाले ब्रह्मरूप ॥

१९८२

# घर

एक घर रुसलं.
धुक्यात जाऊन बसलं !
घर मोठं छान होतं.
झोपाळ्याच्या झोक्यावर
ओटीभर हंसत होतं !
अंगणातल्या जुईवाणी
चहुअंगी फुलत होतं.
दिवसभर पायाखाली,
गोपद्म रेखीव होतं !
उंबऱ्यावरच येणाऱ्याला
सुस्वागतम् म्हणत होतं.
भिंतीवरच्या फोटोमधून
परंपरा सांगत होतं !
देवापुढं समईच्या ज्योतीसवे,
तेवत होत ! !
माजघरी अतिथीच्या
ताटामधे जेवत होतं !
पहांटेला जात्यावर,
ओवीसंगे गात होतं !
परसदारी उंबराच्या
छायेखाली न्हात होतं !
त्याला होते सहा खांब ....
दोन मोठे, चार लहान !
मोठे भार पेलत होते,
छोटे चार झेलत होते !
वादळ, वारा, पाऊस, विजा,

घर म्हणे निर्चित निजा !
दोन मोठ्या आधारावर ....
चार छोटे होते निर्भर !

एक दिवस आला काळा.
सुटली पाखरांची शाळा !
घर म्हणालं, उशीरा आलात.
चारीजण पोरके झालात.
एक वादळ उसळले
दोन मोठे कोसळले !

आता दाणा आणणार कोण ?
आता पाणी पाजणार कोण ?
चार चोची वासलेल्या...
त्यांना चारा देणार कोण ?
चार छोटे कातरवेळी....
मोठे झाले.
अंगण ओसरी, माजघर पडवी.
भिंती पडल्या. गोठे झाले....!

हे माझं ते माझं.
तू वेडा. मी शहाणा.
मी, तूं. मी, तूं.
हसणं विरलं, उरले हेतू.
नातं सरलं, उरले किंतू !

चारीजण माझेच म्हणता....
घर पुरं फसलं !
एक घर रुसलं
धुक्यात जाऊन बसलं !!

१९८४

## मन

एक मन चौपाटीवर
जाता जाता भेळ झालं.
तिथून गेलं थिएटरमध्ये....
सिनेमाचा खेळ झालं.

एक मन सचिवालयात
पाऊल टाकताच मंत्री झालं !
हिवाळी अधिवेशन नागपूरला....
स्टेशनवरच संत्री झालं....!

एक मन मद्यापाठी....
धावून पांढरा घोडा झालं !
बार बंद. ड्राय डे....
बिचारं नुसतं सोडा झालं !

एक मन धक्के खातं....
शब्द होऊन शहाणं झालं.
सहज पेटीपुढं बसलं....
बघता बघता गाणं झालं !

१९८४

# कातरवेळ

शैशवातल्या आठवणींनी
वेल मनींची थरथरते ।
कातरवेळी गोठ्यामधली
अजून कपिला हंबरते ॥

कधी पहाटे जात्यावरची,
मनांत घुमते सात्विक ओवी
रांगत रांगत शुभ्र पिठाने,
बाळमूठही भरून जावी ॥

कधी अचानक परसदारिचा,
मनांत माझ्या उंबर डुलतो ।
आणि खालच्या दत्त पादुका,
आजीसंगे स्वतः पूजितो ॥

कधी अचानक डोणीमागे,
विहिरीवरचा रहाट वाजे ।
अंघोळीचा रोज सोहळा,
शंभोऽ हरहर घरात गाजे ॥

कधी आठवे ओटीवरचा,
झोपाळ्याचा अलगद झोका ।
मांडीवरती गुरगुरणारा...,
मखमालीचा पिवळा बोका ॥

अंगणातल्या आट्यापाट्या,
कधी लढाई लुटूपुटीची ।
कधी आठवे चोरून स्वारी,
भुईमुगाच्या पोत्यावरची ॥

सायंकाळी शुभंकरोती,
देवापुढची लागे समई ।
वाटीमधल्या नैवेद्याची
अजून स्मरते वेडी घाई ॥

देवघरातील गणेश दगडी
स्नान तयाला शुभ्र दुधाने,
कोंदुन जाई सगळे अंतर,
गजाननाच्या आवर्तनाने ॥

देव हरवला देवघरातुन,
सरले अवघे शुभंकरोती ।
उलटा झोका झोपाळ्याचा,
नैवेद्याची रितीच वाटी ॥

उंबर वठला, विहिर बुजली,
पडवीमधले भंगे जाते ।
मनांत तरीही गोठ्यामधली
कपिला वेडी हंबरते ॥
अजून कपिला हंबरते ॥

१९८४

## बाजार !

फ्रीझ घेतला, टी. व्ही. घेतला ।
बाथरुममधला गीझर बसला ॥
डबलबेड फोम गादी ।
खाली हिरवी पिवळी लादी ॥
चार खोल्या, कोरा फ्लॅट ।
दारी उभी नवी फियाट ॥
दिवाणखाना नटला सजला ।
कोपऱ्यात नटराज बैसला ॥
लखलखणारे झुंबर वरती ।
मंद झुळुझुळु पंखे फिरती ॥
सरली बरची सर्व कमाई ।
जुन्या विऱ्हाडी बाबा आई ॥
पुराणातली जुनाट बांगी ।
कळकट लुगडे, मळकट अंगी ॥
जगणे त्यांचे मरणासाठी ।
हाडे स्वतःच्या सरणासाठी ॥
गळते छप्पर, पडता पाऊस ।
नको सुपुत्रा; वळुनी पाहुस ॥
या बाजारी अश्वत्थामा ।
तेल मागतो आत्मारामा ॥
आणि फ्लॅटच्या दारापुढती ।
साद घालतो आर्त ऐक ती ॥
इथे,
माणूस मिळेल का ?
माणूस ?

१९८५

## ॐ स्वार्थाय नमः ।

एक मधूच्या थेंबासाठी
कितीक प्याले वीष प्राशिले ।
कारुण्यावर अन् हास्याचे,
सदा रुपेरी रंग फासले ॥

रंग रुपेरी जीवनात या,
कसली चिंता, कसली भ्रांती ।
चार भिंतींच्या आत कोंडली,
उफाळणारी अवघी क्रांती ॥

उफाळणारी क्रांती गाते,
सुखशांतीचे मनी पवाडे ।
दारोदारी फिरता बघतो,
माझ्यासाठी बंद कवाडे ॥

माझ्यासाठी बंद कवाडे,
सर्व तोरणे स्वार्थासाठी ।
उपभोगाच्या मदिरी गजला,
अवघा माणुस मरण्यासाठी ॥

**ॐ स्वार्थाय नमः ।**
**इदं च मम ॥**

१९८५

# दान !

जेथे जेथे गेलो तेथे,
पायाखाली कांटे होते ।
किती जणांच्या मनांत दडले,
डायनॅमिट्‌चे साठे होते ।। १ ।।

जेथे जेथे गेलो तेथे,
मला मिळाले खोटे हसणे ।
त्या हास्याचा मागे होते,
वडवाग्नीचे सदा धुमसणे ।। २ ।।

जेथे जेथे गेलो तेथे,
नवीन मैत्री, नवीन संगत ।
तूं माझा, मी तुझाच, अंती,
सहा रिपूंची अंगतपंगत ।। ३ ।।

जेथे जेथे गेलो तेथे,
बोल बोललो प्रेमळ, प्रांजळ ।
पाणपोईच्या खाली माझी,
सदा कोरडी राहे ओंजळ ।। ४ ।।

जेथे जेथे गेलो तेथे,
क्षितिज कवळले उराभोवती ।
तिथले मृगजळ दूर राहिले,
सरली मैत्री सरली नाती ।। ५ ।।

जेथे जेथे गेलो तेथे,
कल्पद्रुमाची भासे छाया ।
क्षणांतराने पूर्ण उमगले,
हा तर संभ्रम, ही तर माया ।। ६ ।।

१९८५

# युगांत .... !

आत्यंतिक मोहमायेच्या,
अपरिहार्य वेदनेमधून,
मुक्त होण्यासाठी, कालपुरुषानं,
कवच घेतलं, धर्माचं....!
वाटेत सहस्त्रावधी पांथस्थ भेटले.
उद्घोष केला समूहस्वरांत....,
सहनौभुनक्तु ।
सहवीर्यंकर्वावहै ॥
सार्वत्रिक उपभोग.
सार्वत्रिक शौर्य.
धर्माचं उपनिषद् प्रकट झालं.
धर्मो रक्षति रक्षितः ।
जलप्रलय झाला.
अवघी अवनी डहुळली.
धर्म मत्स्यरूपात मनूचा रक्षक ठरला !
मनूचा धर्म !
स्वजनांबरोबर साऱ्या सजीवांविषयी,
अनुकंपा !
विश्वामित्रानं तेजाला साद घातली.
ॐ भूः भुर्वस्वः ।
वसिष्ठांनी शिवशक्तीचं स्तवन केलं.
ॐ त्र्यंबकं यजामहे ॥
सत्य शिवाची अभिनव गाथा,
गाता गाता कालपुरुष विनम्र झाला !
दारी अतिथी आला.

शाश्वत सौंदर्याचं त्याला दान दिलं,
इदं न मम म्हणून !
यादव मातले. मातीत गेले.
सत्ता आल्या. विरुन गेल्या.
साम्राज्यं, लयाला गेली !
रणवाद्यं कडाडली. धर्म निश्चल उभा !
अहंकारानं फणा काढून डंख मारला.
धर्मानं त्याला निर्विष केलं !
संहाराला अहिंसेनं पराभूत केलं !
आज, आला एक काळा क्षण.
धर्माच्या हाती शस्त्र दिसलं !
धर्मस्थानं युद्धभूमी झाली !
निरापराधांचं हत्याकांड झालं !
संरक्षकधर्म, सर्वभक्षक झाला !
"सहनौभुनक्तु "चे स्वर,
कालपुरुषाच्या किंकाळ्या झाले !
मानव दानव झाला.
पांडव कौरव झाले.
भक्तीचा बाजार मांडला.
कर्मयोग, स्वार्थयोग घडला !
आता काय मागायचं ?
आणि कुणाजवळ.... ?
हा
युगांत
तर
नाही ?

१९८५

# एक सुंदर खुर्ची

एक सुंदर खुर्ची आली,
स्वप्नामधे सहज काल ।
मखमालीची गादी मागे,
सुवर्णाची होती शाल ॥

मनात आले बसू एकदा,
पाहू तरी गंमत ।
स्वप्नात तरी करून घेऊ
थोडी काही गंमत ॥

इकडे तिकडे चोरून पहात,
उडी मारून बसलो ।
सुवर्णाच्या शालीखाली,
अंतर्बाह्य फसलो ॥

एक आला, ऊठ म्हणाला,
मला उठताच येईना ।
मखमालीच्या स्पर्शातून,
मला सुटताच येईना ॥

मी त्याला हळूच म्हटले,
तुला मूठभर नाणी देतो ।
काल पळवून आणलेली,
माझी नवी राणी देतो ॥

माझ्या नावाचा मिरव झेंडा,
कर्तृत्वाचे ठोक भाषण ।
माझ्याविना या खुर्चीची,
भविष्यताही आहे भीषण ॥

गल्लोगली फीर जरा।
घेऊन जारे माझी गाडी ॥
तुझ्या हाती पूर्ण देतो।
तुझ्या गल्लीचीही नाडी ॥

धूळफेक कर जरा।
कचरा मात्र हटवू नको ॥
रस्ता रुंदीत घर बांध।
फक्त त्याला नटवू नको ॥

तो म्हणाला, करतो सारे।
विरोधकांना पळवून लावा ॥
कोपऱ्यावरच्या हॉटेलमध्ये।
जमलेच तर लपवून ठेवा ॥

त्याचे ऐकून सारे केले।
निवडणूक धमाल झाली ॥
कुस्ती आणि आट्यापाट्या,
यांची मोठी गंमत आली ॥

निकालाच्या आधीच जरा,
बाहेर सुरू झाले ढोल।
माझ्याभोवती माझी खुर्ची,
फिरू लागली अवघी गोल ॥

भोवंड आली, जागा झालो।
खुर्चीवरती 'तो' होता।
माझ्या दारी कचराकुंडी,
ठेवता येईल का, पहात होता ॥

१९८६

# तुमचं आमचं छान आहे

तुमचं आमचं छान आहे।
दोघांमधल्या भिंतीचंही,
दोघांनाही भान आहे॥

तुमचा फ्लॅट, आमचा फ्लॅट।
तुमची गाडी, आमची गाडी।
बँक बॅलन्स, तुमचा आमचा,
आपल्यापुरता प्राण आहे॥

तुम्ही कोण आम्ही कोण।
तुम्ही आम्ही भाई भाई।
तुमचं आमचं बोलणं गोड।
तुमची बायको आमची ताई॥

तुम्ही दोघे आण्टी अंकल।
ही बेबीची कॉन्व्हेंट शक्कल॥
तुमच्या घरच्या पार्टीमधली,
आमची बायको शान आहे॥

तुमचं आमचं स्टँडर्ड एक।
तुमचं आमचं शॉपिंग एक।
तुमचं आमचं स्वीमींग एक।
तुमचं आमचं स्लीमींग एक।
तुमचा आमचा क्लब एक।
तुमचं आमचं टेबल एक।
समाजाच्या वरच्या थरात,
तुमचा आमचा मान आहे॥

तुम्ही आम्ही एक करू ।
खिडकीखाली पाह्यचं नाही ॥
कंपाऊंडच्या बाहेर कधी,
तुम्ही आम्ही जायचं नाही ॥
तिकडे सगळी घाण आहे ।
बळवळणाऱ्या कीटकांची,
तिकडे मोठी खाण आहे
तिकडे मुळीच जायचं नाही ।
रोग दैन्य पाह्यचं नाही ॥
जगण्यासाठी मरणाऱ्यांना,
आपलं काही द्यायचं नाही ।
आपले कपडे मळतील ना !
खिसा पाकिटे गळतील ना
तिथे सगळी घाण आहे ।

पोरं शेंबडी, रडकी, काळी ।
दारिद्र्याचा शिक्का भाळी ।
पिकुटलेल्या काळ्या बाया,
जाता येता पडती पाया ।
त्यांचा दादला आहे मुजोरी ।
दिवसभराची करी बिगारी ॥
आम्ही त्याला दंड केला ।
साला शिव्या देऊ लागला ॥
त्यांच्या गल्लीत चहुकडे,
माणुसकीची वाण आहे ॥
तुमचं आमचं छान आहे ॥
तुमचं आमचं छान आहे ॥

१९८६

# एक दिवस ज्ञानदेव स्वप्नात आले !

एक दिवस ज्ञानदेव,
चक्क माझ्या स्वप्नात आले ।
समाधीचे बंध सारे,
अकस्मात गळून गेले ॥
मला म्हणाले, या सूर्याचा,
प्रखर ताप सरला नाही ।
चंद्रावरचा काळा डाग,
अजून कसा विरळा नाही ?

दुरित असे वाढले कसे ?
उपभोगाची चलती दिसे ।
वांछा फक्त स्वार्थांपुरत्या,
तहानेपुरते पाणी नसे ॥

पसायदान ओठामध्ये ।
संहारशस्त्र हातामध्ये ॥
धर्म, पंथ, वर्ण, वंश,
यांची बेडी पायामध्ये ।
या मुक्यांना ओरडून सांग,
आळंदीला येऊ नका ।
पंढरीच्या पताकेला,
खांद्यावरती घेऊ नका ॥

मी म्हणालो, ज्ञानोबा,
मन तुझे जळते का ?
राजकारण म्हणजे काय,
तुला काही कळते का ?
समाज तिकडे मरेना का ?
मला फक्त हवे ।
हेच आहे आता इथले,
पसायदान नवे ।
किती हवे याचाही रे,
हिशोब नको मागू ।
नंबर दोन मधली गंमत,
तुला कशी सांगू ?
तूं आपला आतच बरा ।
येऊ नको बाहेर
तुझ्या माझ्या सौभाग्याचे,
सरले आहे माहेर ॥
कंठावरची मुळी आता,
दूर मुळीच करू नको ॥
इथल्या मद्यभ्रांतीमध्ये ।
गळा माझा धरू नको ॥
तुझे ज्ञान तुझ्यापाशी,
ज्ञानेश्वरी जीर्ण झाली ।
तुझ्या वेड्या अश्वत्थाला,
आता वीषफळे आली ॥
इंद्रायणी कोरडी झाली ।
दुःख त्याचे मानू नको ॥
पुन्हा माझ्या स्वप्नामधे
असा कधी येऊ नको....!

१९८६

# तहान माझी....

तहान माझी खोटी नाही ।
भूक फारशी मोठी नाही ॥
एक हात थरथरणारा ।
मायेचाही पाठी नाही ॥

किती दूर चालणे आहे ।
रीती रिवाज पाळणे आहे ॥
एक प्रेमळ हाक साधी ।
कशी कुणाच्या ओठी नाही ॥

वरवर आहे सारे छान ।
उंच आहे जगात मान ॥
आतुन तुटेल अशी ओढ,
कुणाच्याही पोटी नाही ॥

सावलीविना झाड आहे ।
झावळीविना माड आहे ॥
एक साधे श्रीफळ मात्र ।
नैवेद्याच्या ताटी नाही ॥

इथली नाती ठरवी कोण ?
इथली जाती फिरवी कोण ?
आधार म्हणून धरेन ऐशी,
एक साधी काठी नाही ॥

सारे जगणे स्वार्थासाठी ।
हसणे, रडणे, अर्थासाठी ॥
गुंफायाला माळ पूजेची ।
एक टपोरा मोती नाही ॥

१९८७

# एकविसावे शतक आले....

ढोल धडाडले, दुंदुभी निनादल्या ।
एकविसाव्या शतकाला पायघड्या घातल्या ॥

अहो चला पाय उचला,
बाजार बंद होईल ।
दुकानात ठेवलेला कॉम्प्युटर महाग होईल ।
त्याच्याविना राहू कसा ?
अवकाशात पाहू कसा ?
पृथ्वीवरच्या बँका साऱ्या,
आता ओसंडून गेल्या.... ॥

आज मातृदिन, मदर्स डे ।
उद्या पितृदिन, मदर्स डे ।
सवडीने वृद्धाश्रमात,
फोन करायला हवा ।
भेटायला जमेल का ?
प्रश्न कॉम्प्युटरला,
फीड करायला हवा ।
त्याच्या उत्तरावर आमची क्रिया ।
माणूसकीच्या पेशी पेशी, जळून गेल्या आतल्या ॥

आमच्याकडे दुष्काळ आहे ।
तिकडे पूर, लोंढा आला ॥
दोन्हीकडे बेकारीचा,
कपाळावर धोंडा आला ।
ओंजळभर पाण्यासाठी,
टँकरची वाट पाहिली ॥

साखरेच्या सम्राटांनी,
नद्या साऱ्या आटवल्या ॥
चाळीस वर्षे राज्य आमचे ।
निर्णय आमचे, नेते आमचे ॥
एक राजा, कोटी चमचे ।
पोट फुगून गेले तरी,
अजून खूप खायचे ॥
नातू, पणतू यांच्यासाठी,
घरे बंगले घ्यायचे ।
मते आम्ही विकत घेतो,
आश्वासने फुकट देतो,
झोपडपट्ट्या गांवोगावी
बेसुमार वाढल्या ॥

जगण्यासाठी शस्त्र हवे ।
बोफोर्स देते, अस्त्र नवे ॥
कुणी पाणबुड्या कुणी तोफा,
महायुद्धाच्या उठती वाफा ।
कुणी कुणास किती दिले ?
आळीमिळी कुणी घेतले ?
मध्यस्थांच्या दलालीच्या
हिशोबवह्या फाटल्या ॥

कुठला बाप, कुठली आई ?
कुठला भाऊ, कुठली ताई ?
आमचे आम्ही मस्त आहोत ।
खाऊन पिऊन तुस्त आहोत ।
टी. व्ही. वरच्या रामायणाने
उगीचच पापण्या दाटल्या ॥

१९८७

# अजून खरं फुलायचं आहे....

अजून खरं फुलायचं आहे....
फांदीवरती झुलायचं आहे।
येत्या जात्या पांथस्थाला,
गंधस्नात करायचं आहे॥

पावसामधे भिजायचं आहे....
उन्हात तावून निघायचं आहे।
पाकळीवरच्या दंवबिंदूला,
आंत शोषून घ्यायचं आहे॥

देणं घेणं व्हायचं आहे....
श्वास निश्वास ल्यायचं आहे।
हळूच कुणाच्या केशकलापी,
एकदा तरी मिरवायचं आहे॥

पहाटेला हंसायचं आहे....
पाखरासंगे गायचं आहे।
केसराच्या सतारीवर,
ओला षड्ज् शिंपायचं आहे॥

तहानेला थेंब आहे...
भुकेपाठी कोंब आहे।
समोर येईल त्याला सारे,
माझे मी पण द्यायचं आहे॥

खूप जेऊन न्हायचं आहे...
वाऱ्यावरती डुलायचं आहे।
अखेर अंती मातीमधली,
माती होऊन रहायचं आहे॥

मातीच्याच गर्भाशयात
पुन्हा हळूच शिरायचं आहे ।
पानाआडून पुन्हा नव्या,
जगाकडे पहायचं आहे ॥
अजून
खरं
फुलायचं
आहे.

१९८७

## अश्वत्थामा . . . !

अहो, तुम्ही केंव्हा कसेही हेटाळा....
माझ्या मनीचं आभाळ निरभ्र राहील ॥
कुणाच्या कुठल्याही सलण्यावर,
माझा श्वास फुंकर घालील ॥
एका अनोख्या पहाटे उगवलेल्या सूर्यानं....,
सारा तिमिर कालसमुद्रात बुडवून टाकला ॥
संत उद्‌गारले,
असे तापहीन मार्तंड होऊ ॥
हेटाळणीचे किती डाग साहिले ।
तरीही संतांचे स्वप्न आहे,
अलांछित चंद्रमा ॥
जन्मदत्त डाग आणि दैवदत्त ताप....
दोन्ही पांघरून आज भरकटणं नशिबी.
अश्वत्थाम्याची वाहती जखम
शिरावर बाळगीत....
माणूसपणाच्या पळीभर तेलासाठी ॥

१९८८

# कोण खोट, कोण खरे ?

सध्या तरी तुमची आमची
भेट होणं अवघड आहे ।
बिल वेळेवर भरूनसुद्धा,
आमचा फोन डेड आहे ॥

तसेच येऊ म्हणता ?
रस्ता ओलांडता येणार नाही ।
रिक्षा, मोपेड सायकल यांचा,
व्यूह भेदला जाणार नाही ॥

संध्याकाळी येऊच नका.
घरी आमच्या अंधार असतो ।
कारणाविना वीज बंद,
तक्रारीला वावच नसतो ॥

अंधारातही आलात जरी,
तुमच्यासंगे बोलू काय ?
आसाम, लंका, पंजाब यांचे,
आपल्या बोलास फुटतील पाय ॥

सौहार्दाचे देणे घेणे,
आता कसले पाह्यचे नाही ।
सुखदुःखानी घरात कुठल्या
देवाणघेवाण व्हायचे नाही ॥

तुमच्या घरी तुम्ही बरे,
आमच्या घरी आम्ही बरे.
भेटून तरी कळणार कसे,
कोण खोटे, कोण खरे ?

१९८८

# अंधार यात्रा !

स्वयंप्रकाशी दीप संपले ।
राजमार्ग धोक्याचे झाले ।
आता पुढचे वळण बाकडे घाटामधले आहे ।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे ॥

सखे सोबती सर्व विखुरले ।
नेता ना, अनुयायी उरले ।
दंश कराया सर्प विखारी मधे थांबला आहे ।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे ॥

मूठभरांची मार्गी नाकी ।
वसूल करतील खोटी बाकी ।
त्यांना त्यांच्या दर हप्त्याची नित्य काळजी आहे ।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे ॥

भेटतील तुज कुणी संन्यासी ।
जाऊ नको तू त्या मार्गासी ।
तिथल्या भगव्या रंगाखाली भोगही दडला आहे ॥
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे ॥

आतंकाची घेई चाहुल ।
जपुन टाक रे, पुढचे पाऊल ।
रक्तपात अन् अग्निकांड ही त्यांची नीति आहे ।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे ॥

लाजही तुजला कोणी देतील ।
तुझ्या घराची मते मागतील ।
सत्ता आणि खुर्चीसाठी त्यांचे जगणे आहे ।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे ॥

त्यांची खुर्ची त्यांची सत्ता।
तुझिया पाठी बसतील लत्ता।
पायाखाली जगा तुडविणे त्यांची रीति आहे।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे॥

तरीही पथिका पुढे पुढे जा...
पडशी अपुली सांभाळीत जा।
गरज त्यातल्या चैतन्याची नवांकुरांना आहे।
पुढची सारी यात्रा आता अंधाराची आहे॥

१९८८

# सलाम

कुठे कुणी काही म्हणा,
आम्हा त्याची पर्वा नाही ।
सलाम आमचा सर्वांनाही ॥
सलाम आमचा सर्वांनाही ॥

आम्ही आपले किडामुंगी,
कणकण शोधित फिरतो ।
जगापासून दूर दूर,
वारुळ आमचे बांधित बसतो ।
निमूटपणे जगून होता,
जातो आम्ही निर्वाणाही ॥
सलाम आमचा सर्वांनाही ॥

कधी होतो रेशीमकिडा,
कोशामध्ये लपून बसतो ।
आमचा कोश अखेर अंती,
मऊ रेशीमधागा होतो ।
मोल त्याचे कळणार कसे ?
हिरव्या तुतीपर्णांनाही ॥
सलाम आमचा सर्वांनाही ॥

कधी आम्ही बैल होतो,
उन्हातान्हात राबतो ।
संध्याकाळी गोठ्यात येऊन,
रवंथ करीत बसतो ।
गोचीड मात्र सदा असतात,
चिकटलेले कर्णांनाही ॥
सलाम आमचा सर्वांनाही ॥

कधी आम्ही सरडा होतो,
फक्त कुंपणापर्यंत धावतो।
पाठीवरचा रंगबदल,
आमचा आम्हा शोभतो।

आम्ही आपले दाद देतो,
भवतालच्या वर्णांनाही ॥
सलाम आमचा सर्वांनाही ॥

आम्ही शोध घेतो आहे,
कुठे नम्र व्हायचे आहे ?
कुठे उसळून अभिमानाने,
ठाम उभे रहायचे आहे ?
दूर सारणे कोणा, आणि,
कुणा कवळणे चरणांनाही ॥
सलाम आमचा सर्वांनाही ॥

१९८८

## अपना उत्सव....

तेल संपले, तूप हरवले,
तांदूळ आज मिळणार नाही।
ज्वारी गहू संपून गेले,
नवा टूक पळणार नाही।
उन्हातान्हात लांबच रांग,
हाच आमचा सण उत्सव।
अपना उत्सव....अपना उत्सव!!

आज वीज बंद आहे,
उद्या पाणी येणार नाही।
रस्त्यावरची कचराकुंडी,
मोकळी करून नेणार नाही।
आज संप, उद्या सुट्टी.
परवा आहे शिमगा उत्सव।
अपना उत्सव....अपना उत्सव!!

पांढरे कागद पिवळे झाले,
वाळवी फाईल खाऊन ठाकी।
आमची अजून यायची आहे,
कचेरीतून पेन्शन बाकी।
उन्हातान्हात हेलपाट्यांचा,
रोज चाले वारी उत्सव।
अपना उत्सव... अपना उत्सव!!

पंजाबमध्ये दहा खून
आसाममध्ये जाळपोळ।
गुरखा लँड धुमसतीय,
लंकेमधला वाढे घोळ॥
खोमेनींच्या आदेशावर,
रश्दी भोगे मरणमहोत्सव।
अपना उत्सव....अपना उत्सव!!

आमची जात, आमचा धर्म,
कोण काढेल आमचे वर्म?
आमचे असून आमचे नाही,
एकात्मता कोण पाही?
धृतराष्ट्राच्या गांधारीसम,
मायभूमीचा अंधमहोत्सव।
अपना उत्सव....अपना उत्सव!!

तिकिट कोणाकोणा हवे?
कुणापाठी गुंड किती?
कायदा नियम गुंडाळणारी,
कुणापाठी झुंड किती?
तलवार, पिस्तुल सत्तूर यांचा,
ज्यांच्या हाती शस्त्र महोत्सव।
अपना उत्सव....अपना उत्सव!!

अहो, मला निवडून द्या!
मी संसदेत जातो,
तिथे नुसते गालांत हसून
सारी घटनाच बदलून टाकतो!
माझ्या चिकण्या हास्यामध्ये,
लोकशाहीचा खून महोत्सव।
अपना उत्सव....अपना उत्सव!!

१९८९

## मॅरेथॉन

सध्या आम्ही पळत असतो !
धनगराच्या मेंढरामागं,
मेंढरू होऊन वळत असतो ! !
धनगर आमचा तालेवार
खुर्चीतच जन्मा आला ।
शिवारभर मेंढरं चारून
शिवाराचाच राजा झाला ।
आम्ही नुसत्या लेंड्या टाकून,
कांटेबाभळ चघळत असतो ॥

पळून पळून जायचं कुठे ?
विचारायचं कोणी नाही ।
गेला बाजार ओंजळभर,
पिण्यासाठी पाणी नाही ।
अर्धपोटी उपाशांना,
बकासूर गिळत असतो ॥

पळा, पळा, तुम्हीही पळा,
दिल्ली आता दूर नाही ।
सध्या हवा बरी आहे,
कसलाही धूर नाही ।
स्वार्थासाठी जो तो अपुल्या,
मित्र माना पिळत असतो ॥

स्वातंत्र्याची पळापळी
कुणी कधी ऐकली काय !
षंढत्वाची मिरासदारी,
कुणी कधी पाहिली काय ?
त्यांचा खिसा भरण्यासाठी,
आमचा खिसा गळत असतो !!

आता थांबू नका राव,
दिल्लीकडे रीघ आहे ।
आश्वासने योजनांचा
तिकडे मोठा ढीग आहे ।
बेंऽबेंऽ करून मागू थोडे,
जो तो लाज कोळत असतो ॥

पळता पळता करडं पारडं,
तग धरतील काय ?
मोठं होण्याआधीच त्यांचे,
गळून पडतील पाय ।
त्यांचा विचार करणारा पण,
जन्मभर जळत असतो ॥
सध्या आम्ही पळत असतो !!

१९८९

२६०७
काव्य २६५७
२३।१०

अश्वत्थाची छाया सगुण सद्भाव ।
समाधिस्त देव ज्ञानराजा ॥
आळंदीसी आले पंढरीचे रूप ।
अनादी अरूप प्रकटला ॥
हरिपाठ ओवी दिशादिशा गायी ।
इंद्रायणी वाही अर्घ्य त्याला ॥
शब्दांना सुगंधु श्रवणासी दृष्टि ।
भवताली वृष्टि प्रेमभाव ॥
इंद्रायणी कांठी हरपला दंभ ।
प्रगटला कुंभ अमृताचा ॥

॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

REFBK-0026051
REFBK-0026051

एका रजःकणाला,
चैतन्य स्पर्श होई ।
अवकाश भेदुनी तो,
अनहात रूप घेई ॥

त्याच्या प्रसारणाला,
नुरले क्षितीज बंध ।
स्पर्शात जळुन गेला,
व्यवहार अर्थ अंध ॥

अस्तित्व सर्व त्याचे,
विश्वात्म रूप झाले ।
अन् लेखणीत माझ्या,
त्याचे सुनीत आले ॥



ते गीत नित्य गाणे,
माझीच भाग्य रेखा ।
सरला सहा रिपूंचा,
अज्ञान अंध हेका ॥

आंता प्रकाश भवती,
सरले विकल्प सारे ।
आनंद गीत गाऊ
या, अंगणात यारे ॥

रवींद्र भट